# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १६ मार्च, २०१८ / फाल्गुन २५, १९३९ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री<br>(३) पर्यावरण मंत्री<br>(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७५**

---

### राज्यात गुटखा व तत्सम अन्न पदार्थाला प्रतिबंध करण्याबाबत

**(१) * ३९१२९ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९५१ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात गुटखा सहजरित्या उपलब्ध होत असून यासाठी गुटखा तस्करांशी आर्थिक संबंध असणारे काही अधिकारी जबाबदार असल्यामुळे गुटखा तस्करांना संरक्षण देणाऱ्या व त्यांच्याशी संबंध असणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत दिलेल्या पत्रासंदर्भात सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) तसेच, मुंबईतील सांताक्रुझ येथील एस.व्ही. रोडवरच्या रिझवी पार्क सोसायटीतील दोन गाळ्यांमध्ये सापडलेल्या गुटख्यासंदर्भातील चौकशी व तपास पूर्ण झाला आहे काय, सदर प्रकरणी प्रतिबंधित केलेल्या साठ्याचे नमुने प्राप्त झाले आहेत काय, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात गुटखा विक्रीला प्रतिबंध करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) नाही.
(२) तपास पूर्ण झाला असून विश्लेषणासाठी पाठविलेल्या सदर अन्न नमुन्यांचे अहवालही प्राप्त झाले आहेत. त्यानुसार दिनांक ०६/०३/२०१८ रोजी संबधितांवर न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.
(३) अद्याप चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयावर माध्यमिक शिक्षकांनी आक्रोश मोर्चा काढल्याबाबत

**(२) * ३८९३८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, अॅड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाकडून सातत्याने शिक्षण कायद्याशी विसंगत व संभ्रमात टाकणारी परिपत्रके काढण्यात येत असल्याने शिक्षक-शिक्षण संस्था शिक्षकेतर कर्मचारी त्रस्त झाले असून शासनाच्या शिक्षण विषयक धोरणाचा निषेध करण्यासाठी पालघर येथे माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी जनआक्रोश मोर्चा

काढून आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी, पालघर यांना दिल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाने शाळा खाजगी कंपन्यांना चालविण्यास देण्याचा निर्णयही घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांच्या मागण्या काय आहेत, तसेच एकूण मागण्यांपैकी किती मागण्या मंजूर करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांच्या मागण्या मान्य करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, दिनांक ३०/१२/२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिलेले आहे हे खरे आहे.

(२) कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ८(१)(अ) मधील तरतुदीनुसार धर्मादाय उद्दिष्टासाठी नोंदणीकृत झालेल्या कंपनीस शैक्षणिक क्षेत्रात कार्य करण्याची इच्छा असल्यास तशी संधी मिळावी याकरिता महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मध्ये तशी सुधारणा प्रस्तावित आहे.

(३) व (४) सदर निवेदनामध्ये सातवा वेतन आयोग लागू करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, विनाअट निवडश्रेणी देणे, घोषित/अघोषित खाजगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, वाढीव तुकड्यांना टप्पा अनुदान देणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध सुधारीत करणे, अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्ण वेळ करणे, शिक्षक व शिक्षकेतर भरतीवरील बंदी उठवणे, स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित शाळांना पोषण आहार देणे इ. मागण्या करण्यात आलेल्या आहेत. या मागण्याबाबत वेळोवेळी निर्णय घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदान देण्याबाबत

**(३) * ३७८९६ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५८५१ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १९ सप्टेंबर, २०१६ च्या शासन आदेशाने राज्यातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना २० टक्के अनुदान देऊन शाळांना पुढील टप्पा प्रचलित धोरणानुसार देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अनुदानास पात्र म्हणून दिनांक १ व २ जुलै, २०१६ रोजीच्या शासन आदेशातील शाळांना आर्थिक तरतुद करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे १०० टक्के अनुदान घेण्यास पात्र असून शासनाच्या निधी अभावी २० टक्के अनुदान घ्यावे लागत असून सदर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनेचा लाभ दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शिक्षकांना पुढील अनुदानाचा वाढीव टप्पा व वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करणेसाठी लोकप्रतिनिधी व शिक्षक संघटना यांच्याकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पुढील अनुदानाचा टप्पा व वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत तसेच मुल्यांकनास पात्र ठरलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांच्या याद्या घोषित करुन आर्थिक तरतुद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) मंत्रिमंडळाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ च्या बैठकीतील निर्णयानुसार शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये अनुदान सूत्रामध्ये सुधारणा करण्यात आली असून पात्र शाळांना शासनाच्या पुढील आदेशापर्यंत सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान अनुज्ञेय करण्यात आले आहे.

(२) नाही.

(३) मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार सदर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान अनुज्ञेय आहे. १०० टक्के अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे.

(४) याबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत.

(५) व (६) मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार २० टक्के प्रमाणे अनुदान अनुज्ञेय असल्याने याबाबत वेगळी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

-----------------

## शाळेला निकड असलेल्या शिक्षण सेवकास सेवेत पुनर्दाखल करण्याबाबत

**(४) * ३८८०४ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक शाळेतील शिक्षकास अतिरिक्त ठरविताना शाळेची विषयनिहाय निकड लक्षात घेणे आवश्यक असताना विषयांची निकड लक्षात न घेता केवळ सेवा जेष्ठतेच्या आधारे शिक्षण सेवकांना सेवामुक्त करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विषयाची निकड समजून शिक्षण सेवकास सेवा सातत्य देण्याबाबत तसेच शाळेची विषयनिहाय निकड लक्षात घेता सेवामुक्त केलेल्या व शाळेला निकड असलेल्या शिक्षण सेवकास सेवेत पुनर्दाखल करून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१६ नुसार आयुक्त, शिक्षण यांचेस्तरावर जेष्ठता यादीनुसार समायोजनाची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयाचा कायम शब्द काढण्याबाबत

**(५) * ३८१७३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयाचा कायम शब्द काढावा यासाठी शासनस्तरावर निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही

(२) कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयाचा कायम शब्द काढण्याबाबतची बाब शासनाच्या तूर्त विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शालेय शिक्षण विभागाच्या शासन आदेशातील अट रद्द करण्याबाबत

**(६) * ३८९६१ श्री.कपिल पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २९ जून, २००२ च्या शासन आदेशाने १२ वर्षे व २४ वर्षे सेवा करणाऱ्या शिक्षकांना अनुक्रमे वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी दिली जाते परंतु वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणीसाठी जाचक अटी लादणारा आणि शिक्षकांच्या दोन्ही प्रवर्गात वाद निर्माण करणारा शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी निर्गमित केला आहे, त्यामागील उद्देश व तरतुदी काय आहेत, तसेच सन २००५ नंतरच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा, शिक्षकांवर ऑनलाईन कामांची सक्ती करू नका, ह्या मागण्यांबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन आदेशातील अट क्र. ४ नुसार सदर वेतनश्रेणी मिळविण्यासाठी शिक्षकांना त्यांच्या शाळा सिध्दीनुसार A ग्रेड व इ. ९ वी व इ. १० वी चा निकाल ८० टक्के असणे अशी अट घालण्यात आली असून शाळा सिध्दीची श्रेणी व शाळेचा निकाल या बाबी वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी पात्र असलेल्या शिक्षकांवर लादणे योग्य नसल्याने सदर शासन आदेशातील अट क्र. ४ रद्द होण्यासाठी शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनास मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयातील जाचक अटी रद्द करुन निवडश्रेणीसाठी कोणतेही २० टक्क्याचे बंधन न लावता सरसकट सर्वांना पदोन्नती लागू करण्याची मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या अन्यायकारक शासन निर्णयाच्या विरोधात तसेच इतरही अन्यायकारक शासन आदेशाविरोधात दिनांक ३ व ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी राज्यभर आंदोलन करून निषेध नोंदविला असून उक्त शासन निर्णयातील वरील जाचक अटी रद्द कराव्या व पूर्ववत सरसकट सर्व शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी देय करावी याबाबतचे निवेदन नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासनास पाठवून मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.वित्त मंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री आणि मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१७ रोजी व त्यापूर्वी पत्र पाठवून या शासन निर्णयासंबंधी विचार करून तो रद्द करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाच्यादृष्टीने सदर शासन आदेशातील अट क्र. ४ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

सदर शासन निर्णयान्वये राज्यातील मुलांना शिक्षण हक्क कायद्यानुसार गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याचा उद्देश आहे.

जुनी पेन्शन योजनेबाबत अनेक प्रकरणी न्यायप्रविष्ठ आहेत.

ऑनलाईन कामे करण्याची सक्ती शिक्षकांना करण्यात आलेली नाही.

(२), (३), (४) व (५) होय.

(६) शिक्षण हक्क कायद्यानुसार राज्यातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचा हक्क प्राप्त झालेला असून मुलांना त्यापासून वंचित ठेवणे कायद्याने उचित ठरत नाही. त्यामुळे सदर शासन निर्णयातील अट क्र. ४ रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबत

**(७) * ३७९६० श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३११६४ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे बीओटी तत्वावर गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी नवीन पूर्वव्यवहार्यता अहवाल मागवून कार्यवाही करण्याचा निर्णय मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास मुंढेगाव (ता.इगतपुरी) येथील जागा सांस्कृतिक कार्य विभागास हस्तांतरीत करण्यासाठी महसूल व वन विभागाने संमती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक येथे बीओटी तत्वावर गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबतचा पूर्वव्यवहार्यता अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पूर्वव्यवहार्यता अहवालाच्या अनुषंगाने नाशिक येथे चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निराला विद्‌यालय, नागपूर या शाळेची चौकशी करण्याबाबत

**(८) * ३७७९५ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निराला विद्‌यालय, सेन्ट्रल एव्हेन्यु रोड, नागपूर या शाळेचे नियमबाह्य हस्तांतरण, शाळेतील बोगस विद्‌यार्थी संख्या व गैरव्यवहार आणि मध्यान्ह भोजन योजनेच्या शालेय पोषण आहारात गैरव्यवहार करणे याबाबत उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत करून चौकशी करण्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ व ३० ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत चौकशीची मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच निराला विद्यालयाच्या संचालकांनी सदरहू शाळा स्व.बन्सराज सिंग ठाकूर एज्यु. सोसा. नागपूर या शिक्षण संस्थेस नियमबाह्यरित्या हस्तांतरण केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेच्या इमारतीत एकूण ६ शाळा चालविण्यात येत असून बोगस विद्यार्थी संख्या दाखवून अनुदान लुबाडण्यात येत असल्याबाबतच्या तक्रारीच्या चौकशीचे आदेश विभागीय आयुक्त, नागपूर यांनी दिले असूनही चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शाळा जादा मिळालेला शालेय पोषण आहार बाजारात विकत असून दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी शालेय पोषण आहाराचा तांदूळ बाजारात विक्रीला नेत असतांना तहसिल पोलिसांनी ट्रकसह जप्त केला आणि शाळेच्या लिपीकास व ट्रक ड्रायव्हरला मुद्देमालासहीत अटक केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निराला विद्यालय, नागपूर या शाळेची चौकशी करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) निराला विद्यालयाच्या हस्तांतरणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येत असून अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

(३) हे खरे नाही. तथापि मा.श्री.नागोराव गाणार, वि.प.स. यांच्या तक्रारीनुसार स्व. बन्सराज सिंग ठाकूर एज्युकेशन सोसायटीच्या शाळांची चौकशी करण्यात आली आहे.

(४) होय.

(५) याबाबत प्रथम खबरी अहवाल दिनांक २७/१०/२०१७ अन्वये तहसिल पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उत्तरपत्रिका तपासणीचे मानधन वेळेवर देण्याबाबत

**(९) * ३८७४० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७४५४ ला दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या परिक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी इयत्ता १० वी करीता रुपये ४.५० व १२ वी करीता रुपये ५.५० प्रमाणे मानधन दिले असून मागील १५ वर्षापासून हेच मानधन मिळत असून त्यात वाढ करण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, माहे मार्च-फेब्रुवारी, २०१७ व माहे जुलै-ऑगस्ट, २०१७ मध्ये झालेल्या पुरवणी परिक्षेचे पेपर तपासणीचे व बाह्यपरिक्षकांचे मानधन शिक्षकांना मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एका पेपर तपासणीसाठी किमान रुपये १५ मानधन वेळेत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. परीक्षेशी निगडीत विविध घटकांच्या मानधनात वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रस्तावित ऑलिम्पिक भवन नाशिक येथे उभारण्याबाबत

**(१०) * ३७९८४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३३१ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात विविध राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रात ऑलिम्पिक भवन उभारण्याच्या अनुषंगाने ऑलिम्पिक भवनासाठी पुणे शहर किंवा शहरालगतच्या अन्यत्र स्वतंत्र २ एकर जागा उपलब्ध करून देण्याबाबत संचालनालयाकडून जिल्हाधिकारी, पुणे यांना पत्राद्वारे कळविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून जागा उपलब्ध करून देण्यात आली नसल्याने त्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगर परिसरात जागा संपादित करून प्रस्तावित ऑलिम्पिक भवन नाशिक येथे उभारण्याच्या अनुषंगाने शासनाकडून कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तावित ऑलिम्पिक भवनासाठी पुणे शहर किंवा पुणे शहरालगत अन्यत्र स्वतंत्र २ एकर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत क्रीडा संचालनालयाच्या दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१४ व दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविण्यात आले आहे. परंतु अद्याप जागा प्राप्त झालेली नाही. तसेच प्रस्तावित ऑलिम्पिक भवन नाशिक येथे उभारण्याच्या अनुषंगाने शासनाकडून कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुण्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्याबाबत

**(११) * ३८२१० ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील नामांकित महाविद्यालयांनी सन २०१६-१७ या वर्षाच्या पाच हजार विद्यार्थ्यांचा ईबीसी रक्कमेचा धनादेश उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महाविद्यालयाकडे पाठवून शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना देण्याबाबत कार्यवाही करुन शिष्यवृत्तीच्या रक्कमेचे विद्यार्थ्यांना वाटप न करणाऱ्या महाविद्यालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) महाविद्यालयीन प्रवेशाच्यावेळी ईबीसी सवलत पात्र विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क घेण्यात येत नाही. ईबीसी सवलत योजनेंतर्गत सदर शिक्षण शुल्काची रक्कम प्रतिपूर्तीच्या स्वरुपात संबंधित महाविद्यालयांना देण्यात येते. त्यानुसार ईबीसी सवलत योजनेंतर्गत पुणे येथील महाविद्यालयातील ईबीसी सवलत पात्र विद्यार्थ्यांची सन २०१६-१७ या वर्षाची शिक्षण शुल्काची अनुज्ञेय रक्कम प्रतिपूर्तीच्या स्वरुपात संबंधित महाविद्यालयांना देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(१२) * ३७९७३ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९९८ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॉरेस महाविद्यालय, नागपूर मैदानात राष्ट्रीय मुस्लिम हक्क संघर्ष समितीच्यावतीने मुस्लिम समाजाला शैक्षणिक व नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळण्यासाठी एक दिवसीय धरणे आंदोलन करुन आंदोलनाच्यावेळी कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांमार्फत मा.मुख्यमंत्री व मा.राज्यमंत्री यांना मागण्यांचे निवेदन देऊन शासनाच्या प्रतिनिधीने शिष्टमंडळास भेट देण्याबाबत विनंती केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संघर्ष समितीच्या शिष्टमंडळास शासनाच्या कोणत्या प्रतिनिधीने भेट देऊन चर्चा केली आहे, तसेच संघर्ष समितीने कोणकोणत्या मागण्या केल्या व त्यापैकी कोणत्या मागण्या मान्य केल्या आहेत,

(३) तसेच, यावल (जि.जळगांव) येथे महाराष्ट्रीयन मुस्लिम आरक्षण समितीच्यावतीने मुस्लिम समाज शिक्षणात मागे असल्याने त्यांना आरक्षण मिळावे या मागणीसाठी यावल तहसिलदार कार्यालयावर दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुक मोर्चा काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मुस्लिम समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अध्यादेशाद्वारे राज्यातील मुस्लिम समाजाला शासकीय नोकरी, शैक्षणिक सोयी-सुविधा इत्यादीमध्ये शासनाच्या दिनांक ९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशान्वये ५ टक्के आरक्षण देण्याबाबतच्या निर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी मुस्लिम समाजाला नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण

देण्याबाबत अंतरिम निर्णय दर्शविला असून मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कोणतीही कार्यवाही केली नसून मा.उच्च न्यायालयाचे मत व दिशानिर्देशाचे स्वरुप काय आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२) राष्ट्रीय मुस्लिम हक्क संघर्ष समिती चंद्रपूर यांना पटवर्धन मैदान धरणे स्थळी त्यांची कोणत्याही शासनाचे प्रतिनिधीने भेट घेतलेली नाही. सबब त्यांनी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयात सादर केले असे चौकशीअंती निवेदनकर्त्यांने सांगितले.
(३) होय हे खरे आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक १४/११/२०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने दिनाक ०९/०७/२०१४ ते दिनांक २३/१२/२०१४ या काळातील शासकीय तसेच अनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेश अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक ०९/०७/२०१४ ते दिनांक १४/११/२०१४ या दरम्यानच्या काळातील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या अबाधित राहणार आहेत. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नदी संवर्धन प्रकल्प प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत

**(१३) * ३८०१५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.अनिल परब, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नदीकाठी वसलेल्या गाव-शहरांतील सांडपाण्यामुळे नद्या प्रदुषित होऊन मानवी आरोग्य, शेती, पिण्याचे पाणी व नद्यांची जैवविविधता यावर विपरीत परिणाम व जलजन्य रोगांमध्ये वाढ होत असल्याने यावर प्रतिबंध घालण्यासाठी नदी संवर्धनाचे २० प्रस्ताव सादर झाले परंतु सदर प्रकल्पाला गती न मिळल्याने सदरील नदी संवर्धन प्रकल्पाचा प्रस्ताव माहे मार्च, २०१४ पासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच शासनाने २० नदी खोऱ्यांचे सर्वेक्षण केले असून यामध्ये मोठ्या शहरातील सांडपाण्यामुळे ७० टक्के व औद्योगिक सांडपाण्यामुळे ३० टक्के नद्या प्रदुषित झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढते नागरीकरण, औद्योगिक वापरामुळे जलप्रदूषणात वाढ होत असल्याने सदरील प्रकल्पाला चालना देऊन गाव-शहरांतील प्रदुषित होणाऱ्या नद्यांचे संवर्धन तसेच राज्यातील या नैसर्गिक जलसंपत्ती व जलस्त्रोतांचे सरंक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त नदी संवर्धन प्रस्तावांचे स्वरुप काय आहे व मानवी आरोग्याच्यादृष्टीने महत्वाची असतानाही आजतागायत मंजूरीअभावी प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत प्राप्त प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आले होते. तथापि सदर योजनेंतर्गत निधी उपलब्ध नसल्याचे केंद्र शासनाने कळविले असल्याने याबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस कळविण्यात आले आहे.

राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने संबंधितांना राज्य नदी संवर्धन योजनेतील मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(२) केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यातील प्रदुषित पट्ट्यातील नद्या मुख्यत्वे नागरी सांडपाण्यामुळे प्रदुषित झाल्या आहेत.

(३) राष्ट्रीय नदी कृति योजनेंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी संवर्धनाच्या अनुषंगाने सांडपाणी संकलन व प्रक्रिया यासाठी केंद्र शासनामार्फत रुपये ९९०.२६ कोटी एवढ्या खर्चाचा प्रस्ताव मंजूर झालेला असून पुणे महानगरपालिकेस रुपये २५.९९ कोटी रुपये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योगांना विनाप्रक्रिया सांडपाण्याचा विसर्ग करण्यास बंदी घातलेली असून उद्योगातून निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रियाकृत सांडपाणी बाहेर सोडण्याचे निर्देश दिलेले आहेत.

राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांना सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी त्यांच्या भांडवली खर्चाच्या २५% निधी राखून ठेवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

राज्यात दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये नमामि चंद्रभागा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली असून सदर प्रकल्पासाठी रुपये १६.८० कोटी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील अंत्योदय स्वस्त धान्य शिधापत्रिकाधारकांना धान्य देण्याबाबत

**(१४) * ३९१०७ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दारिद्रय रेषेखालील अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांमधून एक ते दोन व्यक्ती असलेल्या कुटुंबाची शिधापत्रिका अंत्योदय मधून प्राधान्य यादीत समाविष्ट केली जाणार असून अंत्योदय स्वस्त धान्य शिधापत्रिकाधारकांना पुर्वी मिळत असलेल्या ३५ किलो धान्याऐवजी ५ किलो धान्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना आवश्यक ते १०० टक्के स्वस्त धान्य व इतर जीवनावश्यक वस्तू मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा माजी लोकप्रतिनिधींनी ठाणे, पालघर, रायगड व नाशिक या ४ जिल्ह्यांमधील तहसिल कार्यालयाकडे व शासनाकडे दाखल केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशामुळे ग्रामीण भागातील अंत्योदय स्वस्त धान्य शिधापत्रिकाधारकांमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामीण भागातील अनेक गरजू व्यक्तींवर उपासमारीची वेळ येणार असल्याने स्वस्त धान्य शिधापत्रिकाधारकांना पुर्वी मिळत असलेले ३५ किलो धान्य देण्याबाबत तसेच प्राधान्यक्रमातील लाभार्थ्यांची यादी शासनस्तरावर निश्चित करून अंत्योदय योजनेबाबत काढलेला आदेश त्वरित मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यातील शिधापत्रिकाधारकांचे आधार सिडींगचे काम सुरु आहे. त्या आधार सिडींगनुसार इष्टांक बदलाची कार्यवाही सुरु असून, कोणताही पात्र व योग्य लाभार्थी अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

अंत्योदय अन्न योजनेतील ज्या शिधापत्रिकाधारकांना प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे, त्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे. अशा प्रकारे लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आले नसल्याने, सदर निर्णय सद्य:स्थितीत रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात डाळीसह कांदे, खाद्यतेल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंवरील दरवाढ रोखण्याबाबत

**(१५) * ३७६४० श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामराव वडकुते, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सणासुदीच्या दिवसात डाळीसह कांदे, खाद्यतेल, खनिज तेल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंचे दर माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान वाढल्यामुळे नागरीकांमध्ये असंतोष पसरला होता परंतु आता पुन्हा खाद्यतेल, तांदूळ, इंधन इत्यादी वस्तूंची भाव वाढण्याची शक्यता निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१७ मध्ये खरेदी केलेली २५ लाख २५ हजार क्विंटल तूरडाळ स्वस्त धान्य दुकानातून रुपये ५५ प्रतिकिलो दराने विकण्याचा निर्णय शासनाने घेतला असूनही खरेदी केलेली तूरडाळ माहे डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८ मध्ये शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य दुकानात अद्यापी वाटप करण्यात आली नाही तसेच तूरडाळ स्वस्त धान्य दुकानातून विकली जाण्याची शक्यता कमी असल्याने ती खाजगी बाजारपेठेत तसेच मॉलमध्ये विक्री करण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी व त्याडाळीचे दर पुन्हा

ठरविण्यासाठी मा.पणन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्थापन करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) तसेच, शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे (स्वस्त धान्य दुकान) तूरडाळ देण्याच्या योजनेस सुरुवात झाली असून तूरडाळ योजनेस गावामध्ये अनास्था दिसून येत असल्याने बाजारभावापेक्षा केवळ पाच रुपयांनी कमी दर असलेल्या तूरडाळ योजनेस नागरिकांनी प्रतिसाद दिला नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत जिल्हा पुरवठा विभागामार्फत राज्यातील स्वस्त धान्य दुकानांमधून शिधापत्रिकाधारकांना रुपये ५५ प्रतिकिलो दराने तूरडाळीचे वाटप करण्यात येत असून पांढरी टरफले आणि शिजण्यास विलंब लागणारी ही तूरडाळ निकृष्ठ दर्जाची असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या असून सदर प्रकरणी प्राप्त झालेली निविदा प्रक्रिया व तूरडाळ विक्री प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पत्रान्वये शासनाच्या निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्वसामान्य जनतेच्या लाभासाठी स्वस्त धान्य दुकानावर शिधापत्रिकाधारकांना तूरडाळ उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच जीवनाश्यक वस्तूंचे व डाळीचे दर कमी करुन दरवाढ रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४), (५) व (६) सहकार विभागाच्या दिनांक २८/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनामार्फत बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या तुरीची भरडाई करून प्राप्त तूरडाळीची रास्तभाव दुकानातून रुपये ५५/- या दराने विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला असून

त्यानुसार विक्री करण्यात येत आहे. परंतु खुल्या बाजारात डाळींच्या किंमतीत MSP च्या जवळपास सुधारणा होण्याच्या परिस्थितीत रुपये ५५/- प्रतिकिलो या तुरडाळीच्या विक्री दरात बदल करण्याचे तसेच स्वस्त धान्य दुकानातून विक्री होण्याची शक्यता कमी असल्याने खाजगी बाजार, मॉल्स यांना देखील तूरडाळ विक्री करण्याचा निर्णय घेणे याबाबतचे अधिकार मा.मंत्री (पणन) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उपसमिती देण्यात आले आहेत. सदर तूरडाळीची रास्तभाव दुकानांमार्फत विक्री सुरू असून डाळीच्या गुणवत्तेसंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठ लॉ ॲकॅडमीत (उमला) पाच वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

**(१६) * ३७७८९ ॲड.अनिल परब, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने शुल्क आकारुन सुरु केलेल्या लॉ ॲकॅडमी (उमला) पदवी व पदव्युत्तर असा पाच वर्षाच्या अभ्यासक्रमाकडे विद्यापीठाचे दुर्लक्ष होत असून आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येत नसल्यामुळे सन २०१५ मध्ये सुरु करण्यात आलेला अभ्यासक्रम बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, न्यायमूर्ती अभय ओक यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या उमलाच्या सल्लागार समितीच्या चार बैठकी झालेल्या असून त्यात विद्यार्थ्यांच्या व्यवस्थेच्यादृष्टीने महत्वपूर्ण शिफारशी केलेल्या असतानाही त्याकडे विद्यापीठ दुर्लक्ष करीत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अभ्यासक्रम बंद पडण्याची कारणे काय आहेत, तसेच विद्यापीठ बंद पडल्यास दीडशे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पाच वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ववत सुरु करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित जबाबदार असणाऱ्या संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) नाही, दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी न्यायमूर्ती अभय ओक यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने शिक्षक भरतीबाबत दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१८ रोजी थेट मुलाखत घेऊन ४ सहाय्यक प्राध्यापकांची तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांकरीता नेमणूक करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदीत प्रदुषित झाल्याबाबत

**(१७) * ३९१६५ श्री.रामराव वडकुते : तारांकित प्रश्न क्रमांक ३७३५८ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेनगांव, हिंगोली, कळमनुरी (जि.हिंगोली) या तीन तालुक्यात वाहत असणारी कयाधू नदी हिंगोली शहरातील सांडपाण्यामुळे प्रदुषित झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नदी प्रदुषित झाल्यामुळे तिन्ही तालुक्यातील पाणी दुषित झाल्याने तेथील जनतेला पिण्याच्या पाण्याचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदीतील प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही, प्रश्नाधीन तिन्ही तालुक्यांना कयाधू नदीवरुन पाणीपुरवठा करण्यात येत नाही.
(३) व (४) सदर प्रदूषण रोखण्याकरिता नगरपरिषद, हिंगोली यांच्यावतीने १५ दशलक्ष घनमीटर (MLD) क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्राची (STP) उभारणी करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांचा निकाल जाहीर करण्याबाबत

**(१८) * ३८६४२ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.कपिल पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९२७ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या पदवीच्या पहिल्या सत्रातील परीक्षांचे मुल्यांकन पूर्ण करून निकाल वेळेत जाहीर करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिलेली दिनांक १० जानेवारी, २०१८ पर्यंतची मुदत संपूनही अद्याप सुमारे पाच लाख उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन झाले नसल्याने परीक्षा दिल्यापासून ४५ दिवसाच्या आत निकाल जाहीर करण्याची जबाबदारी मुंबई विद्यापीठाने स्विकारुनही पार पाडली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई विद्यापीठात कला, विज्ञान व वाणिज्य शाखेचे पुनर्मुल्यांकनासाठीचे अर्ज कमी प्रमाणात आले तरी सहा हजार उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन प्रलंबित असून त्यांचे निकाल जाहिर करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या संगणकाधारित मुल्यांकन पध्दतीचा गोंधळ झाल्याने मागील सत्रात गहाळ झालेल्या उत्तरपत्रिकाच्या प्रकरणाची सीबीआयमार्फत चौकशी करावी आणि माजी कुलगुरु यांच्यासोबतच निकाल गोंधळासाठी जबाबदार असणाऱ्या संबंधित व्यक्तींवरही कारवाई करावी, अशी मागणी विविध संघटनांकडून होत आहे तसेच मुंबई विदयापीठाच्या ऑनलाईन मुल्यांकनामुळे विदयापीठाला दुप्पट आर्थिक भार सहन करावा लागत असून, विदयापीठाची आर्थिक परिस्थिती सुस्थितीत नसतांना खर्चाचा प्रश्न प्रशासनासमोर निर्माण झाला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन मुल्यांकन घोटाळयाची चौकशी करण्यासाठी श्री.एस.व्ही.आर. श्रीनिवास, सचिव, माहिती तंत्रज्ञान यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली, तसेच मुंबई विद्यापीठाच्या निकालात गोंधळ झाल्यानंतरही ऑनलाईन निकालाचे काम करणाऱ्या मेरिट ट्रॅक कंपनीवर कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे व सदर कंपनीला पूर्ण रक्कम अदा केल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांच्या गोंधळामुळे निकालास उशिर होऊन, पुनर्मुल्यांकन निकालातही गोंधळ झाला, अद्याप विद्यार्थ्यांच्या छायांकित प्रती मिळालेल्या नाही त्यामुळे राज्यातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या निकालाच्या प्रतिक्षेत असलेल्या कित्येत विद्यार्थांनी वर्ष वाया जाऊ नये म्हणून पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन ठेवला असून सदर विद्यार्थ्यांचे वर्ष वाया गेलेले असतानाच विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर प्रवेशासाठी दिलेली शुल्क महाविद्यालये परत करीत नाहीत तसेच इतर

विविध विद्या शाखांमधील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या आणि विदेशी शिक्षणाच्या संधी गमवाव्या लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील विदयापीठाला ऑनलाईन मुल्यांकन व पेपर तपासणीसाठी अनुदान देण्याबाबत तसेच प्रलंबित उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करुन प्रलंबित निकालांमुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान विचारात घेता सदर निकाल लवकर लावण्याबाबत व विद्यार्थ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करुन विद्यापीठातील गोंधळाला आणि गैरकारभाराला जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या सत्राचे म्हणजेच मार्च-एप्रिल, २०१७ ला झालेल्या परिक्षांचे निकाल हे १९ सप्टेंबर, २०१७ पर्यंत जाहिर करण्यात आलेले आहेत. तर दुसऱ्या सत्रातील परीक्षा म्हणजेच ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१७ ला झालेल्या परीक्षांचे निकाल लावण्याचे काम चालू आहे.

(२) हे खरे नाही.

प्रथम सत्र २०१७ च्या परीक्षांच्या पुनर्मुल्यांकनासाठी विद्यापीठाकडे सुमारे ८५ हजार एवढे अर्ज आले होते, त्यापैकी जवळपास सर्व पुनर्मुल्यांकनाचे निकाल विद्यापीठाने जाहीर केले आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन मुल्यांकनाबाबत ज्या काही तांत्रिक चूका झाल्या त्याबाबत चौकशी करण्यासाठी श्री एस.व्ही.आर. श्रीनिवास, सचिव, माहिती व तंत्रज्ञान यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. त्याचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(५) हे खरे नाही.

परदेशी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विद्यापीठाने सुमारे ८ हजार विद्यार्थ्यांना कॉन्फीडेंशिअल निकाल उपलब्ध करुन दिले होते. तसेच पदव्युत्तर प्रवेशासाठी विद्यापीठाने वेळोवेळी मुदत वाढवून दिलेली होती.

(६) ऑनस्क्रीन मार्कींगमध्ये झालेल्या विलंबाच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

-----------------

## पुणे येथील रात्रशाळा व महाविदयालयात शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) * ३८४३७ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रात्रशाळा व महाविदयालयात दुबार नोकरी करीत असलेल्या १४५६ शिक्षकांची सेवा शासनाने एका परिपत्रकाद्वारे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान समाप्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ७ महिने होवूनही त्या जागी पर्यायी शिक्षक उपलब्ध करुन न दिल्याने दहावी-बारावीच्या परिक्षा काही दिवसांवर असताना रात्रशाळेत व महाविदयालयात शिकणाऱ्या विदयार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे येथील रात्रशाळा व महाविदयालयात शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दुबार सेवा करणाऱ्या शिक्षकांना कमी केल्यानंतर सदर रिक्त पदावर अतिरिक्त शिक्षकांची नियुक्तीने सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे, यामुळे विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या समस्यांवर उपाययोजना करण्याबाबत

**(२०) * ३९२०१ श्री.बाळाराम पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील अनेक शिक्षक अतिरिक्त ठरविण्यात आल्याने शिक्षकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून मुंबईतील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासाठी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान उत्तर विभागातून पश्चिम विभागात शिक्षकांचे रिक्त जागी समायोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समायोजन करण्यात आलेल्या शिक्षकांचे वेतन ४ महिने होवूनही देण्यात आले नसल्याने शिक्षक वेतनाच्या प्रतिक्षेत आहेत तसेच कनिष्ठ महाविद्यालयांची संचमान्यता महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९८१ आणि बोर्डाने अभ्यासक्रमात निर्धारित केल्याप्रमाणे केली नसल्याने त्यांचे नुकसान झाल्याचा आरोप शिक्षकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालार्थ प्रणालीत अडचणी आल्यामुळे वेतन मिळण्यास उशिर होत असल्याचे कारण शिक्षण निरीक्षक पश्चिम कार्यालय, मुंबई यांनी दिले असून मान्यतेच्या प्रश्नांसोबतच सन २०१२ पासून नियुक्त केलेल्या शिक्षकांना नियुक्ती दिनांकापासून मान्यता देणे, सेवानिवृत्तांना निवृत्तीवेतन देणे इत्यादी प्रश्न प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांचे उपरोक्त प्रश्न निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर समायोजन ऑगस्ट, २०१७ मध्ये करण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.अल्लाम इक्बाल उर्दु शाळा (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथील तुकड्यांना अनुदान देण्याबाबत

**(२१) * ३८२८४ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा लाडखेड (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथे सन १९८७ पासून सुरु असलेल्या डॉ.अल्लाम इक्बाल उर्दु माध्यमिक व उच्च माध्यमिक या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झालेल्या इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्ग तुकड्याचे दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी शिक्षण आयुक्त यांच्या आदेशानुसार मुल्यांकन झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी झालेल्या मुल्यांकनाबाबतचे अहवाल शिक्षण उपसंचालक, अमरावती यांना पाठविण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर संस्थांच्या इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विनाअनुदानित तुकड्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) होय.

(३) या संदर्भात आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(२२) * ३८६८३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी मिळावे या उद्देशाने शासनाकडून गाव, वाडी, वस्त्यांसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना अशा विविध योजना राबविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ८८ योजनांची कामे सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यानुसार मंजूर झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मंजूर झालेल्या ८८ योजनांपैकी ३० योजना प्रलंबित असून फक्त ४ योजनांतून प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे तसेच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनांची कामेदेखील प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील ८१ योजनांचा सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यामध्ये समावेश आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील ८१ योजनांपैकी २० योजनांद्वारे २६ गावे/वाडी/तांड्यांना पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील ३९ योजनांचा समावेश असून त्यातील १७ योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देऊन, निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. ९ योजनांची

अंदाजपत्रके तांत्रिक समितीसमोर सादर करण्यात आली आहेत. १ योजनेस तांत्रिक समितीची मान्यता देण्यात आली आहे. २ योजना जल स्वराज्य टप्पा-२ अंतर्गत व १ योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत करण्यात येत आहे. १ योजनेच्या उद्भवाबाबत भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेस प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. ५ योजनांची अंदाजपत्रके तयार करण्याची कामे चालू असून, ३ योजना पूर्ण व्यवहार्यता अहवालानुसार अव्यवहार्य असल्याने वगळण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयात स्वस्त धान्य दुकानातून गव्हाचे वितरण करण्याबाबत

**(२३) * ३८८५९ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात जिल्हा पुरवठा विभागाने प्रत्येक तालुक्याचे गव्हाचे नियतन कमी करुन त्याऐवजी मक्याचे नियतन करण्याबाबत कळविले असून अहमदनगर जिल्हयात १६ हजार क्विंटल मक्याचे वितरण स्वस्त धान्य दुकानातून केले जाणार असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गव्हाचे वितरण कमी करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत लाभार्थ्यांचे विरोध लक्षात घेता अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या आदेशाचा पुनर्विचार करुन गव्हाचे वितरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.

(२) व (३) आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्यात खरेदी करण्यात आलेल्या भरडधान्याचे वाटप विकेंद्रित खरेदी योजनेंतर्गत राज्यातच करण्याबाबत केंद्र शासनाचे धोरण आहे. सदर धोरणानुसार राज्यामध्ये खरेदी करण्यात आलेल्या ज्वारी व मका या भरडधान्याचे वाटप त्याप्रमाणात गव्हाचे नियतन कमी करुन राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमान्वये विहित केलेल्या प्रतिकिलो रुपये १/- या दराने लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत करावयाचे असल्याने, केंद्र शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्वामी विवेकानंद हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्‌यालय, कुर्ला, मुंबई येथे नियमबाह्यरित्या मुख्याध्यापिकेची नियुक्ती केल्याबाबत

**(२४) * ३८३६८ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी विवेकानंद हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्‌यालय, कुर्ला, मुंबई (अल्पसंख्यांक संस्था अनुदानित हिंदी माध्यम) या हायस्कूलमध्ये शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन नवीन मुख्याध्यापिकेची नियुक्ती करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन मुख्याध्यापिकेची भरती केल्याप्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बिस्मिल्ला भट कॉलेज ऑफ फार्मसी, खडवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील महाविद्यालयावर कारवाई करण्याबाबत

**(२५) * ३८२५७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे बिस्मिल्ला एजुकेशन ट्रस्ट अंतर्गत बिस्मिल्ला भट कॉलेज ऑफ फार्मसी ह्या महाविद्यालयात डी फार्म सह अनेक अभ्यासक्रम शिकवले जात असून त्यासाठी विद्यार्थ्यांकडून लाखो रुपयांचे शुल्क आकारले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालयाला मान्यता नसून ते बेकायदेशीर चालविले जात असल्याने त्यातील शेकडो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थाचालक अजीमुद्दिन बिस्मिल्ला शेख, रा.वडाला, मुंबई ह्यांनी पालकांकडून लाखो रुपये शुल्काच्या स्वरुपात घेतले असून त्याविरोधात टिटवाळा पोलीस ठाण्यात फसवणुकीची तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकरणी पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर प्रकरणी तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे तक्रार प्राप्त झालेली होती. त्यानुषंगाने सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचेस्तरावर दिनांक १४/०२/२०१८ चे आदेशान्वये व्दिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने दिनांक १६/२/२०१८ रोजी संस्थेची तपासणी केली असून, संस्थेच्या इमारतीला दिनांक १४/२/२०१८ रोजी पोलिसांनी सील केल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

सदर संस्थेविरुध्द श्री.अकील मोहम्मद सिध्दीकी पटेल यांनी कल्याण तालुका पोलीस स्टेशन, जि.ठाणे ग्रामीण यांचेकडे फसवणुकीची तक्रार दाखल केली असून त्या तक्रारीनुसार कल्याण पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ३०८/१७, भा.दं.वि.स. कलम ४२०, ४०६, ४६७, ४६८, ४७१, ३४ दिनांक २५/१२/२०१७ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने कल्याण तालुका पोलीस स्टेशन, जि.ठाणे ग्रामीण यांचेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, चिखले (ता.वाडा, जि.पालघर) कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(२६) * ३७६६३ श्री.रविंद्र फाटक, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीने बेकायदेशीररित्या चिखले (ता.वाडा, जि.पालघर) येथील ओढ्याचा नैसर्गिक प्रवाह बंद करुन कंपनीमध्ये निर्माण होणारे केमिकलयुक्त दुषित सांडपाणी शेतकऱ्यांच्या शेतात सोडत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बंद केल्याने आणि केमिकलयुक्त दुषित सांडपाणी शेतकऱ्यांच्या शेतात सोडल्यामुळे शंभराहून अधिक शेतकऱ्यांचे मागील ७ वर्षांपासून मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केमिकलयुक्त दुषित पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.पर्यावरण मंत्री यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चिखले (ता.वाडा, जि.पालघर) येथील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाबाबत कार्यवाही करुन प्रदूषण करणाऱ्या संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

जून, २०१५ मध्ये फरनेस ऑईलच्या साठवणूक टाकीतून ऑईलयूक्त सांडपाणी बाहेर गेले होते.

(२) मे.अल्ट्राटेक सिमेंट लि. या उद्योगाकडून फरनेस ऑईल साठवणुकीच्या ठिकाणापासून उद्योगामधील बाहेरील नाल्यात वाहून गेलेले ऑईलयुक्त सांडपाणी १८ शेतकऱ्यांच्या १५.३३ हेक्टर बाधित क्षेत्रात असल्याचे तालुका कृषी अधिकारी, वाडा यांनी प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर केलेला आहे.

(३) व (४) दिनांक १२/१२/२०१७ रोजी प्राप्त निवेदनावर कारखान्यास दिलेल्या भेटी दरम्यान कारखान्यातून सांडपाणी बाहेर जात असल्याचे दिसून आलेले नाही. सदरची घटना माहे जून, २०१५ मधील आहे. त्यानुषंगाने जलप्रदूषण व नियंत्रण कायदा, १९७४ नुसार दिनांक ०७/०९/२०१५ रोजी प्रस्तावित आदेश तसेच दिनांक २९/०९/२०१५ रोजी अंतरिम देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणेसह राज्यात मध्यान्ह भोजन योजनेसाठी गॅस सिलेंडर पुरविण्याबाबत

**(२७) * ३८७९५ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक २७०३२ ला दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणेसह राज्यातील ५० हजाराहून अधिक शाळांमधील विद्यार्थ्यांचा आहार चुलीवरच शिजवला जात असल्याचे व त्यामुळे दुर्घटना घडण्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा आहार चुलीवर शिजवला जातो तेथे गॅस सिलेंडर पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्यासाठी पात्र शाळांमध्ये गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून यानुसार कार्यवाही करण्याचे आदेश क्षेत्रिय यंत्रणांना देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## अलिबाग व मुरुड (जि.रायगड) तालुक्यात सागरी नियमन क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(२८) * ३९२२२ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७८२ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सागरी नियमन क्षेत्र कायद्यानुसार समुद्रकिनाऱ्याच्या भरती रेषेपासून ५०० मीटरच्या आत कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी नसताना कायद्याचे उल्लंघन करुन अलिबाग व मुरुड (जि.रायगड) तालुक्यात अनेक अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच रायगड जिल्ह्यातील सागरी नियमन क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याचे आदेश मा.पर्यावरण मंत्री यांनी दोन वर्षापूर्वी देवूनही कोणतीच कारवाई केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बांधकामांना महसूल यंत्रणेमार्फत अनधिकृत बांधकाम निष्कासनाबाबतच्या नोटीसाही देण्यात आल्या असून आतापर्यंत किती अनधिकृत बांधकामांवर प्रत्यक्ष निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे तसेच किती व्यक्तींवर भारतीय पर्यावरण अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अलिबाग व मुरुड तालुक्यातील समुद्र किनारी बांधण्यात आलेल्या अनुक्रमे १४५ व १६७ बांधकामधारकाना महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ तसेच पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ कलम ३(१) व १५ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. सदर दाव्यापैकी अलिबाग तालुक्यातील ६१ व मुरुड तालुक्यातील १०१ दाव्यामधील अनधिकृत बांधकामाबाबत मा.न्यायालयाने तात्पुरते स्थगिती आदेश दिलेले आहेत.

सदर दोन्ही तालुक्यातील अनधिकृत बांधकामापैकी अलिबाग तालुक्यातील ६९ व मुरुड तालुक्यातील ९५ प्रकरणामध्ये महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ व केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक ०६/०१/२०११ रोजीच्या अधिसूचनेमधील निर्देशांचे उल्लंघन केल्याने संबंधितांविरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम ३(१) व १५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील पॉलिटेक्नीकच्या महाविद्यालयातील अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(२९) * ३९२८१ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील ६९ पॉलिटेक्नीक महाविद्यालयांतील २१,००४ जागांपैकी १२,९८१ जागा म्हणजेच ६१.८० टक्के जागा यावर्षी रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही वर्षापासून पॉलिटेक्नीकच्या रिक्त जागांचे प्रमाण वाढत असल्यामुळे अनेक महाविद्यालयाची स्थिती अत्यंत बिकट झाली असून पुढील काही महिन्यात येथील तुकड्या कमी करणे किंवा महाविद्यालय बंद करणे अशा प्रक्रिया सुरु होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील काही वर्षांपासुन पॉलिटेक्नीकच्या रिक्त जागांचे प्रमाण वाढत असल्यामुळे यावर्षी पॉलिटेक्नीकच्या जागा वाढविण्याकरीता शासनाच्यावतीने मुदतवाढ देण्यात येवूनही अर्जाची संख्या वाढली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहरातील पॉलिटेक्नीकच्या महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांची रिक्त जागा भरण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरूप काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) राज्यातील पॉलिटेक्नीक महाविद्यालयातील अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा भरण्याकरीता शासनाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. :-

१) मागील दोन/तीन वर्षापासून कमी प्रवेश होत असलेल्या Information Technology, Electronics Engineering अशा पदविका अभ्यासक्रमांऐवजी Civil Engineering, Mechanical Engineering असे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

२) पॉलिटेक्नीक महाविद्यालयातील पदविका अभ्यासक्रमामध्ये जास्तीत जास्त जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यासाठी अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, पुणे, मुंबई या विभागीय कार्यालयांच्या स्तरावरून माहे एप्रिल/मे या महिन्यामध्ये विद्यार्थी व पालकांसाठी ठिकठिकाणी शिबीरे आयोजित करण्यात येतात.

३) या शिबीरामध्ये त्या-त्या विभागातील अधिकारी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेबाबत संपूर्ण माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करतात. तसेच याबाबतची माहिती स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येते.

४) प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र इत्यादी दस्तऐवज प्रवेश प्रक्रियेपुर्वी उपलब्ध करुन ठेवण्यासाठीची माहिती परिपत्रकाद्वारे तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येते.

५) विद्यार्थ्यांना व पालकांना संपूर्ण प्रवेश प्रक्रियेची माहिती प्राप्त होऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेश घेता येणे शक्य व्हावे, याकरिता प्रवेश प्रक्रियेचे माहितीपत्रक व आवश्यक सूचना तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(३०) * ३९२८३ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे क्रीडा संकुलाकरिता किती निधी मंजुर झाला आहे,

(२) असल्यास, ह्या निधीपैकी किती निधी वापरण्यात आला व कोणत्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आंतरक्रीडा संकुलाचे बांधकाम करण्यासाठी भारतीय क्रीडा प्राधिकरण, नवी दिल्ली द्वारा रुपये ६ कोटी इतका निधी मंजूर झालेला आहे.

(२) त्यापैकी रुपये १ कोटी ८० लक्ष इतका निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्याकडे जमा करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाच्या पुस्तक प्रकाशनाची निविदा प्रक्रिया सुरु करण्याबाबत

**(३१) * ३९७९२ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९७४ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या शिक्षण विभागाने एक भाषिक पुस्तक योजना आणली असून फक्त परिचयाच्या प्रकाशकांना ऑर्डर देण्यात आल्याने या योजनेवर पाच महिने स्थगिती दिल्यानंतर दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पुन्हा नविन यादी जाहिर करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे काय, याकरिता किती निविदा प्राप्त झाल्या आहेत व किती प्रकाशकांना या योजनेंतर्गत ऑर्डर देण्यात आली आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाच्या पुस्तक प्रकाशनाची निविदा प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वजने, मापे व काटे दुरुस्ती सेवा देणाऱ्या परवान्याचे नुतनीकरण करण्याबाबत

**(३२) * ३९९१० ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नियंत्रण, वैध मापन शास्त्र, मुंबई या यंत्रणेमार्फत महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अ) नियम २०११ च्या नियम ६ (४) च्या अनुषंगाने अधिकृत वजने, काटे व मापे विक्री, उत्पादन व दुरुस्तीधारकांना ५ वर्षाच्या कालावधीसाठी परवाने देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियंत्रण, वैध मापन शास्त्र, मुंबई यांच्या दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये नियंत्रण, वैध मापन शास्त्र विभागामार्फत वजने, काटे व मापे यांच्या दुरुस्तीधारकांना १ वर्षाकरिता परवाने देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे, परंतु वजने, मापे तयार करणाऱ्या उत्पादकास परवाने नुतनीकरण ५ वर्षासाठी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वजने, काटे व मापे यांचे दुरुस्ती परवाने १ वर्षाकरिता केल्यामुळे वजने व मापे दुरुस्ती संबंधित सेवा देणाऱ्या सुमारे ३००० मध्यमवर्गीय युवकांच्या रोजगारावर विपरित परिणाम होणार असल्याने वजने, मापे दुरुस्ती सेवा देणाऱ्या परवानाधारकांनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री व उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई यांना परवाना नुतनीकरण ५ वर्षासाठी करण्याबाबत लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वजने, मापे व काटे दुरुस्ती सेवा देणाऱ्या परवानाधारकांसाठी देखील ५ वर्षासाठी परवाना नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) महाराष्ट्र वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम २०११ मधील नियम ६(४) मधील तरतुदीनुसार वजन मापे उत्पादक/विक्रेते/दुरुस्तक यांना देण्यात येणारे लायसन एका कॅलेंडर वर्षाकरिता विधिग्राह्य असते.

तथापि विहित फी व अटींची पूर्तता केल्यानंतर वजन मापे उत्पादक/विक्रेते/दुरुस्तक यांच्या परवान्याचे १ ते ५ कॅलेंडर वर्षाच्या कालावधीकरिता नुतनीकरण करण्यात येते.

(२) नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई या कार्यालयाने दिनांक २९/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विक्रेता परवाने २ वर्षाकरिता व दुरुस्तक परवाने १ वर्षाकरिता नुतनीकरण करण्याचा निर्णय घेतला होता.

परंतु वैधमापन शास्त्र यंत्रणेद्वारे उत्पादक, दुरुस्तक व डिलर यांना दिल्या जाणाऱ्या नवीन परवान्याबाबतचे नुतनीकरणाचे धोरणाबाबत कार्यवाही सुरु असल्याने शासन पत्र दिनांक ०६/०१/२०१७ च्या पत्राचे अनुषंगाने नियंत्रक, वैधमापन शास्त्र यांनी सर्व परवाने १ वर्षाकरिता नुतनीकरण करण्याची कार्यवाही केली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

व्यावसायिकांच्या मागणीनुसार परवाना नुतनीकरणाची मुदत पाच वर्षे करणे गरजेचे आहे असे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) शासन परिपत्रक दिनांक ११/०१/२०१८ नुसार वजन माप उत्पादक, दुरुस्तक व विक्रेता यांना नविन परवाना देणे व परवान्याचे नुतनीकरण तसेच परवान्यामध्ये फेरफार करणे याबाबतच्या धोरणाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना/कार्यप्रणाली निर्गमित करण्यात आली असून त्यानुसार परवाना नुतनीकरणास पात्र असलेले सर्व वजन वा माप यांचे उत्पादक, विक्रेता यांचे परवाने त्यांचे मागणीनुसार कमाल ५ वर्षापर्यंत विहीत अटींच्या अधीन राहून नुतनीकरण करण्यात येणार आहेत. तसेच दुरुस्तक यांचे परवाने ३ वर्षापर्यंत विहित अटींच्या अधिन राहून करण्यात येणार आहे.

अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिकारी वरिष्ठ प्राधिकारी यांचे मान्यतेने या कालावधीमध्ये वाढ करण्याबाबतचा निर्णय घेतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## करकंब (जि.सोलापूर) येथील पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत

**(३३) * ४०४१४ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करकंब (जि.सोलापूर) येथील पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्चुन तयार करण्यात आलेली पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील लोकसंख्या विचारात घेता मागील अनेक वर्षापासून सध्या २ लाख १० हजार क्षमतेच्या टाकीतून पाणीपुरवठा केला जात असून ही टाकी जीर्ण झाली आहे तसेच जलशुध्द करण्याची इमारत दोन वर्षापूर्वी तयार झाली असून मशीनरी बसविण्यात आली नसल्याने या पाणीपुरवठ्याचा टॅंक कोरडा पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता करकंब (जि.सोलापूर) येथील पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) होय हे खरे आहे.

करकंब गावासाठी पाणीपुरवठा करण्यात येत असलेली टाकी (पाणीपुरवठा योजना) देखभाल दुरुस्तीसाठी करकंब ग्रामपंचायतीस माहे मार्च, १९९२ मध्ये हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. प्रगतीपथावरील योजनेंतर्गत नविन ४ लक्ष लि. क्षमतेची उंच टाकी बांधण्यात आली आहे. योजना कार्यान्वित झाल्यानंतर जुनी टाकी वापरावी लागणार नाही.

जलशुध्दीकरण केंद्राची इमारत तयार आहे व पंपीग मशीनरीचा पुरवठा झालेला आहे. पंपीग मशीनरी उभारणीचे काम हाती घेण्यात येत आहे.

संतुलन तलावाची खोदाई झाली आहे. सिमेंट क्रॉकिटचे काम करता यावे याकरिता तलाव कोरडा ठेवणे आवश्यक आहे. सध्या जुन्या विहिरीतून ग्रामपंचायतीमार्फत पाणीपुरवठा सुरु आहे.

(३) जानेवारी, २०१७ मध्ये योजनेस सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे.

सुधारित योजनेतील मंजूर तरतूदीनुसार वाढीव कामाच्या व अतिरिक्त बाबीच्या अनुषंगाने असणाऱ्या प्रस्तावांना माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये मंजुरी दिलेली आहे. सध्या योजनेची उर्वरीत कामे प्रगतीपथावर असून सदर योजना माहे मे, २०१८ अखेर कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय आश्रमशाळांना स्वस्त धान्य दुकानातून धान्याचा पुरवठा करण्याबाबत

**(३४) * ४०४३४ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांना राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून स्वस्त धान्य दुकानातून होणारा धान्य पुरवठा माहे एप्रिल, २०१७ पासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान्य पुरवठा बंद झाल्याने शाळा व्यवस्थापनाला बाजारातून रुपये ३ ते ४ हजार क्विंटल दराने धान्य विकत घ्यावे लागत असल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत असून तहसिल विभागांतर्गत असलेल्या पुरवठा विभागाच्या धान्य गोदामात धान्यांचा तुटवडा असल्याने शाळांना धान्य उपलब्ध होऊ शकले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विकास विभागाकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या अनुदानातून निवासी विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास, आरोग्य व इतर सुविधा वाढत्या महागाईमुळे पुरविणे शक्य होत नसताना, स्वस्त धान्य दुकानातून मिळणारा धान्य पुरवठा देखील बंद झाल्याने आश्रमशाळा व्यवस्थापन चिंतेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वस्त धान्य दुकानाचा धान्य पुरवठा पूर्ववत सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच आश्रमशाळांचा बंद झालेला स्वस्त धान्य पुरवठा कधीपर्यंत पूर्ववत सुरु होणे अपेक्षित आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१), (२), (३), (४) व (५) कल्याणकारी संस्था व वसतिगृह यांच्याकरिता माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीसाठी द्यावयाचे अन्न धान्य केंद्र शासनाकडून अद्याप प्राप्त झालेले नाही.

केंद्र शासनाकडून उपरोक्त कालावधीतील धान्याचे नियतन प्राप्त न झाल्यामुळे राज्यातील कल्याणकारी संस्थांमधील लाभार्थी धान्याअभावी वंचित राहू नये, यासाठी ज्या जिल्ह्यांकडे सदर योजनेतील धान्य शिल्लक आहे, त्या जिल्ह्यांनी सदर शिल्लक धान्यातून सर्व संस्थांना तात्काळ धान्याचे वितरण करावे व ज्या जिल्ह्यांकडे वरीलप्रमाणे धान्य शिल्लक नाही, त्या जिल्ह्यांनी इतर योजनेतील धान्य कल्याणकारी योजनेंतर्गत धान्य वितरणासाठी वर्ग करून वाटप करण्यात यावे, असे दिनांक ०२/०८/२०१७ व दिनांक २१/११/२०१७ च्या शासन पत्रान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांनी मिळून एकूण ८६४५.७३८ मे.टन गहू व ७३६०.४४६ मे.टन तांदूळ अशा एकूण १६००६.१८४ मे.टन अन्नधान्याचे वाटप कल्याणकारी संस्थांना केलेले आहे. केंद्र शासनास उपरोक्त कालावधीतील अन्नधान्याचे नियतन देण्यासाठी वेळोवेळी मागणी करण्यात आली आहे.

-----------------

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील बेकायदा नियुक्त्या व प्रतिक्षा यादी तयार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३५) * ४०५०१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे नोव्हेंबर, २००९ मध्ये फील्ड ऑफीसर या पदावर नियुक्ती करण्यासाठी राज्यभर भरती केलेल्या ११७ उमेदवारांच्या नियुक्त्या व ३९ उमेदवारांची तयार केलेली प्रतिक्षा यादी मा.उच्च न्यायालयाने रद्द करताना, लेखा परिक्षा व मुलाखती घेण्यासाठी अवलंबविलेल्या कार्यपध्दतीत मंडळाने गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फिल्ड ऑफिसरची किती पदे भरावयाची होती व त्यासाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव व इतर कोणत्या विशेष अर्हता प्राप्त उमेदवाराची आवश्यक होती,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी असलेल्या प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पदाधिकारी व उच्चपदस्थ अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजीच्या आदेशात असा निष्कर्ष मा.उच्च न्यायालयाने काढलेला आहे.

(२) फील्ड ऑफीसरची एकूण ११८ पदे भरावयाची होती.

फील्ड ऑफीसर या पदासाठी शैक्षणिक अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठ/संस्थेचा अभियांत्रिकी शाखेचा पदवीधर किंवा पर्यावरणीय शास्त्र किंवा तत्सम विषयात पदव्युत्तर पदवी आवश्यक.

त्याचबरोबर उमेदवाराचे वय मंडळाच्या अथवा शासनाच्या सेवेत नसल्यास कमाल ३५ वर्षेपेक्षा जास्त नसावे.

सदर जाहिरातीत फील्ड ऑफीसर पदासाठी अनुभवाची अट नव्हती.

(३) व (४) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजीच्या आदेशाविरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून व शासनाकडून मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष विनंती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील शाळा संचमान्यता कार्यवाहीची फेरतपासणी व फेरचौकशी करण्याबाबत

**(३६) * ४०६१६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळांमधील संचमान्यतेबाबत शालेय शिक्षण विभागाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी क्र.एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२ अन्वये शासन निर्णय जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयाची कार्यवाही करताना वसई तालुक्यातील (जि.पालघर) शाळांमध्ये २७ शिक्षक अतिरिक्त असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अतिरिक्त २७ शिक्षकांची पालघर जिल्ह्यातील जव्हार, तलासरी व मोखाडा येथे रिक्त असलेल्या जागांवर नेमणूक न करता त्यांना पुन्हा वसई तालुक्यातच बेकायदेशीरपणे सामावून घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसई तालुक्यातील शाळा संचमान्यता कार्यवाहीची फेरतपासणी व फेरचौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धनेगाव, वाजेगाव, तुप्पा व बळीरामपूर (जि.नांदेड) गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३७) * ४०६७८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनेगाव, वाजेगाव, तुप्पा व बळीरामपूर (जि.नांदेड) या चार गावांचा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा खंडीत केल्यामुळे गावातील नागरीकांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत असल्याने येथील नागरीक त्रस्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चार गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) दिनांक १२/०१/२०१८ ते १८/०१/२०१८ या कालावधीत थकीत वीज देयकाअभावी चारही गावाच्या पाणीपुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला होता. तद्नंतर संबंधित ग्रामपंचायतीनी किमान चालू वीज देयक भरणा करावे या अटीवर वीज मंडळाने वीज पुरवठा चालू केला असून आजमितीस चारही गावाचा पाणीपुरवठा चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथील क्रीडा संकुलातील गाळे चुकीच्या पध्दतीने भाडेतत्वावर दिल्याबाबत

**(३८) * ४०७०६ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील कुमठा नाका क्रीडा संकुलातील सुमारे ३६ गाळे हे चुकीच्या पध्दतीने तसेच गैरमार्गाने भाडेपट्टयावर दिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त क्रीडा संकुलातील आवश्यक बाबी उदाहरणार्थ बॅडमिंटन हॉल, जलतरण तलाव इत्यादी महत्वाची कामे बाकी असताना फक्त व्यापारी गाळे भाडेपट्टयावर देण्याचे काम तातडीने केल्यामुळे गैरमार्गाचा अवलंब झाल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोर्ली (ता.तासगांव, जि.सांगली) येथे दूध भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३९) * ४०८८६ श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोर्ली (ता.तासगांव, जि.सांगली) येथे दूध पावडर, खाद्यतेल आणि अन्य वस्तूंचा वापर करुन बनावट दूधनिर्मिती करणाऱ्या व्यक्तीविरुध्द मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांकडे खटला दाखल करण्यात आल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक भागात बनावट दूधनिर्मिती व दूध भेसळ करणारे उदयोग सुरु होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील व्यक्तीवर दोषारोपपत्र दाखल करुन दूधनिर्मिती व दूध भेसळ करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

बनावट दूध निर्मितीचा प्रकार राज्यामध्ये कोठेही आढळला नाही. तथापि पुणे व नाशिक विभागात दूध पावडर, खाद्यतेल यासारख्या अन्न पदार्थाचा वापर करुन दूध भेसळ करणारे काही प्रकार निदर्शनास आले आहेत.

(३) डोर्ली (ता.तासगाव, जि.सांगली) या प्रकरणी चौकशी करुन दोषी व्यक्तीवर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत न्यायदंडाधिकाऱ्यांकडे दिनांक २२/०१/२०१८ रोजी खटला दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच राज्यात इतर भागातही अशा दूध भेसळ प्रकरणी नियमितपणे व विशेष मोहिमा राबवून दूध भेसळ करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक शाळेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेश खर्च व धुलाई भत्ता देण्याबाबत

**(४०) * ३७७०० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक शाळा सेवा शर्ती व नियमावलीनुसार माध्यमिक शाळेत काम करणाऱ्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी शालेय कामकाजाच्या वेळी गणवेश वापरला पाहिजे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना गणवेशासाठी प्रत्यक्ष होणारा खर्च व धुलाई भत्ता यापूर्वी दिला जात होता परंतु सद्य:स्थितीत या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा हा खर्च बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकेतर कर्मचारी यांना गणवेश खर्च व धुलाई भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २४/०८/२००० अन्वये खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व अध्यापक विद्यालयातील पुरुष कर्मचाऱ्यांकरीता रुपये २६०/- व स्त्री कर्मचाऱ्यांना रुपये ३००/- या दराने गणवेष भत्ता देण्याची तरतूद आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्राथमिक व माध्यमिक शाळांतील संचमान्यता पट संख्येनुसार करण्याबाबत

**(४१) * ३८८२१ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक व माध्यमिक शाळांतील संचमान्यता दरवर्षी ३० सप्टेंबर च्या पटसंख्येनुसार करावी असे शासन आदेश आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारे सन २०१६-२०१७ करीता शिक्षकांची पदे मंजूर करता येतील काय,

(३) असल्यास, मागील वर्षाच्या व चालू वर्षाच्या पटसंख्येतील फरकामुळे शिक्षकांच्या पदसंख्येत तफावत होत असून त्याचे शालेय व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ प्रमाणे शिक्षक संख्या निश्चित होईपर्यंत अतिरिक्तांच्या समायोजनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ नुसार २०१५-१६ साठी पदे मंजूर होतात.

(३) अंशत: खरे आहे.

(४) सन २०१५-१६ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी चित्रकला, फार्मसी व अध्यापक महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत

**(४२) * ३८१७१ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी चित्रकला, फार्मसी व अध्यापक महाविद्यालयांना ९० टक्क्यांऐवजी १०० टक्के वेतन अनुदान द्यावे याबाबत संबंधित संचालकांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे,

राज्यातील खाजगी चित्रकला व फार्मसी महाविद्यालयांना ९० टक्के ऐवजी १०० टक्के वेतन अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव, संचालक, कला व संचालक, तंत्रशिक्षण यांनी शासनास सादर केला आहे. राज्यातील खाजगी अनुदानित अध्यापक महाविद्यालयांना १००% वेतन अनुदान दिले जात असल्यामुळे संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून याबाबत कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(२) प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देयकांच्या प्रतिपूर्तीची थकबाकी अदा करण्याबाबत

**(४३) * ३८९५७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती न झाल्यामुळे कोटयवधी रुपयांची थकबाकी शिक्षक-शिक्षकेतरांना मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त थकबाकीबाबतचा तपशिल व कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक-शिक्षकेतरांची थकबाकी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांचे डिजिटलाजेशन करण्याबाबत

**(४४) * ३९३७८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषदांच्या ३१४ शाळांचे डिजिटलाजेशन करण्यासाठी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक २ जून, २०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांना पाठविलेला प्रस्ताव माहे जानेवारी, २०१८ पर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर जिल्हा परिषद शाळा डिजिटल करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.
(२) येवला गटातील एकूण २३६ जिल्हा परिषद शाळांपैकी, २३२ शाळा डिजिटलाजेशन झालेल्या आहेत व उर्वरित ४ शाळा समाज सहभागातून गट शिक्षणाधिकारी (तालुका) स्तरावर प्रस्तावित आहेत.

निफाड गटातील एकूण २३५ जिल्हा परिषद शाळांपैकी, २०७ शाळा डिजिटलाजेशन झालेल्या आहेत व उर्वरित प्रलंबित शाळांपैकी, २८ शाळा समाज सहभागातून गट शिक्षणाधिकारी (तालुका) स्तरावर प्रस्तावित आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया येथील वेतनपथक कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत

**(४५) * ३७९९३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या वेतनपथक कार्यालयात नियमित अधिकारी व कर्मचारी नियुक्त न केल्याने शाळांची व शिक्षकांची वेतनासंबंधीची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण विभागातही शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ०४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन पाठवून त्याप्रकरणी कार्यवाही करण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

(४) व (५) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रानुसार पदोन्नती कोट्यातील केवळ खुल्या प्रवर्गाच्या पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्याबाबत निदेश असल्याने पदोन्नतीवर निर्बंध आले आहेत. त्यामुळे गट-ब संवर्गातील पदे रिक्त आहेत. गट-क व गट-ड ची पदे भरण्यासंदर्भात नमूद करण्यात येते की, वित्त विभागाने दिनांक २५/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार आकृतिबंध अंतिम झाल्याशिवाय पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही असे नमूद केले आहे. त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे. तसेच शिक्षकांची पदे शासन निर्णय, दिनांक २३/०६/२०१७ मधील तरतुदीनुसार भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## औरंगाबाद शहरातील आरटीई योजनेंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची थकीत रक्कम देण्याबाबत

**(४६) * ३८७३३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१२ मध्ये आरटीई कायदा अंमलात आणला असून या कायद्यांतर्गत प्रत्येक शाळांनी आर्थिकदृष्टया गरीब असणाऱ्या २५ टक्के मुलांना शिक्षण देणे बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी शासनाने प्रति विद्यार्थी शाळांना रुपये १४०००/- द्यावेत हा नियम असल्याने यानुषंगाने औरंगाबाद शहरातील ४३७ शाळांमध्ये ४१५६ विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पैसे देण्यास शासन वर्ष-वर्ष विलंब लावत असून शाळांचे रुपये ८ कोटी शासनाकडे थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांची थकीत रक्कम देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) आर.टी.ई. कायद्यातील तरतुदीनुसार खाजगी विनाअनुदानित (अल्पसंख्यांक शाळा वगळून) शाळांमध्ये वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के प्रवेश देणे बंधनकारक केले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे स्वतंत्र फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन विद्यापीठ उभारण्याबाबत

**(४७) * ३९५२९ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३३३ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चित्रपट निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र चित्रपट विद्यापीठ उभारण्याचा निर्णय महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठासाठी प्रस्तावित करण्यात आलेली जागा अद्याप महामंडळाच्या ताब्यात मिळाली नसून चित्रपटसृष्टीसाठी प्रस्तावित जमीन सांस्कृतिक कार्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यास महसूल व वन विभागास विनंती केली असून याबाबत त्या विभागाकडून जमीन हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वतंत्र फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन विद्यापीठासाठी नाशिक येथे जागा संपादित करुन चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांचे जन्मस्थान असलेल्या नाशिक येथेच सदरचे विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी नाशिककर कलाप्रेमी नागरिकांची भावना विचारात घेता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

चित्रपट विदयापीठ मे.व्हिसलिंग वूडस इंटरनॅशनल लि. यांच्या ताब्यात असलेल्या इमारतीत सुरु करण्याचे प्रस्तावित होते. तथापि, सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सेमी इंग्रजी शिक्षण पध्दत बंद करण्याबाबत

**(४८) * ३९७८१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सेमी इंग्रजी शिक्षण पध्दत बंद करण्यात येणार असल्याचे वक्तव्य शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सेमी इंग्रजी शाळांची जिल्हावार चौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास या शाळेतील शिक्षक व शिकणाऱ्या विदयार्थ्यांच्या पुढील भविष्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) विभागात शिधावाटप कार्यालय सुरु करण्याबाबत

**(४९) * ४००२८ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) विभागात सुमारे ५ ते ६ लाख लोकसंख्या असून येथील नागरिकांच्या सोयीसाठी कल्याण (पूर्व) परिसरात शिधावाटप कार्यालय सुरु करावे अशा आशयाची मागणी करणारे विनंती वजा निवेदन जेष्ठ नागरिक सेवा संस्था, कल्याण (पूर्व) यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीच्या अनुषंगाने कल्याण (पूर्व) भागातील नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी शिधावाटप कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच किती कालावधीत कल्याण (पूर्व) परिसरात शिधावाटप कार्यालय सुरु करणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.

जेष्ठ नागरिक सेवा संस्था, कल्याण (पूर्व) यांचे दिनांक १५/०१/२०१७ चा दिनांक असलेले निवेदन दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) विभागाच्या लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्याचा (End to End Computerization) निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार रास्त भाव दुकानातून लाभार्थ्यांची बायोमेट्रीक ओळख पटवून अन्नधान्याचे वाटप करण्यात येत आहे. तसेच नवीन शिधापत्रिका देणे, त्यामध्ये नावे समाविष्ट करणे, नावे वगळणे या सेवा सेवाहमी कायदा, २००५ अंतर्गत घोषित करण्यात आल्या असून या सेवा जनतेसाठी ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे. ऑनलाईन सेवा कार्यान्वित झाल्यावर नागरिकांची गैरसोय होणार नाही. त्यामुळे नवीन कार्यालय सुरु करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांना आधारभूत धान खरेदी केंद्रावरील विक्री मर्यादा कमी करण्यात आल्याबाबत

**(५०) * ३९१४४ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना आधारभूत धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करताना १७ क्विंटलची अट असून मागील वर्षी सदर धान विक्रीची मर्यादा ३० क्विंटल होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी ३० क्विंटल असलेली सदर मर्यादा यंदाच्या हंगामात १७ क्विंटल एवढी कमी केल्याने शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचे धान उत्पादक शेतकऱ्यांनी निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासनाकडून आधारभूत धान खरेदी योजनेत फक्त शेतकऱ्यांचेच धान खरेदी व्हावे व कोणत्याही परिस्थितीत व्यापाऱ्यांकडून धान खरेदी होऊ नये याकरिता पिकपेऱ्यानुसार तसेच कापणीनंतर कृषी विभागाकडून प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक भौगोलिक परिस्थिती व धानाचे पिकाखालील क्षेत्र विचारात घेऊन तसेच आणेवारी/पैसेवारी याचा विचार करुन, धान खरेदीची मर्यादा निश्चित केली जाते. तथापि, हंगाम २०१७-१८ मध्ये १५ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भंडारा यांनी तात्पुरत्या स्वरुपात पिकपेऱ्यावरुन १७ क्विंटल प्रतिहेक्टरी इतकी मर्यादा निश्चित केली होती. परंतु त्यानंतर धानाच्या कापणीनंतर कृषी विभागाकडून सदर मर्यादा विदर्भातील जिल्ह्यांमधे प्रतिहेक्टरी २८ ते ३० क्विंटल, कोकण विभागात २५.६८ क्विंटल अशी करण्यात आली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांकडून धान खरेदी केली जात आहे.

(२) प्रत्येक वर्षी धान खरेदीची मर्यादा धानाच्या उत्पादकतेवर अवलंबून असते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन बंद करण्याबाबत

**(५१) * ४०७५९ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लातूर, यवतमाळ, रत्नागिरी, धुळे, जालना व सोलापूर येथील शासकीय तंत्रनिकेतन संस्था बंद करुन त्याठिकाणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्यात येणार असल्याचे कारण देऊन शासनाने दिनांक ३० जानेवारी, २०१८ पासून बंद करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तंत्रनिकेतन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षी बंद करण्यात येऊ नयेत असे आदेश अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तंत्रनिकेतन संस्थांतील विद्यार्थ्यांची व त्याठिकाणी काम करीत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही. तथापि, शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ व पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातुर या दोन तंत्रनिकेतनांमध्ये सुरू असलेले पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून टप्प्याटप्प्याने बंद करुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून अभियांत्रिकी महाविद्यालयात श्रेणीवर्धन करणेचा निर्णय घेण्यात आला असून, तसा प्रस्ताव अखिल

भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे सादर करणेबाबत तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासनाचे दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(२) नाही.

(३) शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ व पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातुर या दोन तंत्रनिकेतनांमध्ये सुरू असलेले पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून टप्प्याटप्प्याने बंद करण्यात येणार असल्यामुळे तेथील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना अन्य शासकीय तंत्रनिकेतनामध्ये सामावून घेणे/परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्याबाबतची योग्य ती कार्यवाही तंत्र शिक्षण संचालनालयाकडून केली जाणार आहे.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पर्यायी व्यवस्थेस अनुसरून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार संस्थानिहाय आवश्यक असलेली मंजुर पदे विचारात घेऊन नविन पदांच्या निर्मितीसाठी व या संस्थामध्ये सध्या असलेल्या पदांच्या रुपांतरणासाठी आवश्यक ती समायोजनासह कार्यवाही तंत्रशिक्षण संचालनालयाकडून करण्यास शासनाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात भरड धान्य खरेदी केंद्र कार्यान्वित करण्याबाबत

**(५२) * ३८४५२ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१७-१८ च्या हंगामामध्ये भात, ज्वारी, बाजरी व मका या भरड धान्यांच्या आधारभूत किंमती जाहिर करुन परिपत्रकाद्‌वारे शासनाने खरेदी केंद्रांची घोषणा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भातील शासनाच्या परिपत्रकातील अटी जाचक असून त्यामध्ये अनेक त्रुटी असल्यामुळे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवडयापर्यंत राज्यातील एकही सहकारी संस्था खरेदी केंद्र सुरु करण्यास तयार नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय.
(२) हे अंशतः खरे आहे.

शासनाने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात नमूद केले आहे की पणन हंगाम २०१७-१८ करिता भरडधान्याची खरेदी दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ पासून सुरु करण्यात यावी. त्यानुसार नोव्हेंबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत अभिकर्ता संस्थांकडून ज्वारी व मक्याची ३२२६.६९ क्विंटल खरेदी करण्यात आलेली होती.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांची ऑनलाईन कामे रद्द करण्याबाबत

**(५३) * ३९२०४ श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४८१ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळातील शिक्षकांना शैक्षणिक कामांबरोबरच अशैक्षणिक कामे, त्यामध्ये बी.एल.ओ., जनगणना यासारखी कामे दिल्याने शिक्षकांच्या शैक्षणिक कामांच्या वेळेचा अपव्यय होतो तसेच शासनामार्फत शासन निर्णय निर्गमित करुन शिक्षकांना स्वच्छता अभियानाबरोबरच विद्यार्थ्यांची बँक खाती उघडणे, पोर्टलवर विद्यार्थ्यांची माहिती अपलोड करणे इत्यादी अशैक्षणिक कामे सोपविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शिक्षकांना शौचालय, जनावरे व अन्य राष्ट्रीय कामातून मुक्त करण्याचा विचार असल्याची घोषणा मा.ग्रामविकास मंत्री यांनी दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास शिक्षक महाअधिवेशनात केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांवर अशैक्षणिक कामांची जबाबदारी दिल्यामुळे त्याचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमावर व गुणवत्तेवर विपरित परिणाम होत असल्याने अशैक्षणिक कामे काढून ती कामे बेरोजगार युवकांना देण्याबाबतचे लेखी निवेदन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने, लोकप्रतिनिधी तसेच शिक्षक संघटना यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात मा.शालेय शिक्षण मंत्री व प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांचेकडे दिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षकांना शाळांतील विद्यार्थ्यांचे आधार नंबर जर पूर्णपणे नोंदविले नाहीत, तर माहे फेब्रुवारी, २०१८ चे वेतन मिळणार नसल्याचे संदेश व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मागील ३ वर्षापासून शाळांतील सर्वच कामे ऑनलाईन पध्दतीनुसार नोंदविण्याचे काम सुरू केल्याने शिक्षकांना हातात खडू धरण्याऐवजी माऊस धरण्याची वेळ येऊन पडली असून शिक्षकांना देण्यात आलेले ऑनलाईनचे काम करण्यासाठी शासनाची साईट मंदगतीने चालणे, मध्येच साईट बंद पडणे, ऑनलाईन भरलेली माहिती साईटवरुन अचानकपणे गायब होणे असे प्रकार होत असल्याने शिक्षकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून ऑनलाईनच्या विविध कामांनी शिक्षक व अन्य कर्मचारी बेजार झाल्याने संबंधित अधिकारी व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून संदेश पाठवून ऑनलाईन कामे एका नेमून दिलेल्या तारखेपर्यंत पूर्ण करण्याबाबत सूचना देतात, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांना शाळाबाहय कामातून वगळून शासनाची असणारी ऑनलाईनची वा इतर कामे सुशिक्षित बेरोजगार तरूणांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अशा आशयाचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे.
(४) शालार्थ वेतनप्रणाली सद्य:स्थितीत तांत्रिक कारणास्तव सुरु नसल्याने अशा शिक्षकांच्या वेतनाची देयके प्रलंबित आहेत. ऑफलाईन वेतन काढण्याची परवानगी दिली आहे.
(५) हे खरे नाही.
(६) सद्य:स्थितीत सदर बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शौचालय बांधलेल्या लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत

**(५४) * ३९९४४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गत रायगड जिल्हयातील अनेक ग्रामपंचायती हागणदारी मुक्त झाल्या असल्या तरी तालुक्यातील अनेक गावांमध्ये लाभार्थ्यांनी घरगुती शौचालय बांधून १ वर्ष होवूनही उक्त लाभार्थ्यांना पूर्ण अनुदान मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील ४६१५ लाभार्थ्यांनी सदर योजनेतून घरगुती शौचालय बांधले असून त्यांना रूपये २ कोटी ७६ लाख ९० हजार अनुदान देणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर लाभार्थ्यांना पूर्ण अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत रायगड जिल्हयात सन २०१६-१७ व २०१७-१८ या दोन वर्षात एकूण ४८५५९ लाभार्थ्यांना शौचालय बांधकाम प्रोत्साहन रक्कम देण्यात आली आहे. उर्वरित ४२५८६ लाभार्थ्यांना शौचालय बांधकाम प्रोत्साहन रक्कम देण्यात आलेली नाही.

(२) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात सन २०१६-१७ व २०१७-१८ या दोन वर्षात एकूण ७६८४ लाभार्थ्यांना शौचालय बांधकाम प्रोत्साहन रक्कम देण्यात आली आहे. उर्वरित ३३८४ लाभार्थ्यांना शौचालय बांधकाम प्रोत्साहन रक्कम रुपये ४ कोटी ६ लाख ८ हजार देणे बाकी आहे.

(३) व (४) स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जानेवारी, २०१८ पर्यंत रुपये ७५५३२.७१ लक्ष इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला असून, त्यापैकी २५४६.३६ लक्ष इतका निधी रायगड जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच राज्य हिश्श्यापैकी रुपये १७०.८२ लक्ष इतका निधी रायगड जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात आलेला आहे.

आता, केंद्र शासनाने स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत फेब्रुवारी, २०१८ मध्ये रुपये ४०००० लक्ष इतका निधी वितरीत केला आहे. सदर निधीमधून रायगड जिल्ह्यासाठी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात केरोसिन पुरवठ्यासाठी काम करणाऱ्या हॉकर्स व रिटेलर्सचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५५) * ३८८६१ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.विक्रम काळे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील** : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या उज्वला योजनेंतर्गत स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरची कृत्रिम आकडेवारी दाखवून राज्याला देण्यात येणारा केरोसिनचा पुरवठा कमी करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण राज्य केरोसिनमुक्त करण्यात येणार, अशी घोषणा शासनाने केली असल्याने केरोसिन पुरवठयासाठी काम करणाऱ्या राज्यातील ५५ हजार हॉकर्स व रिटेलर्स व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या सुमारे ३ लाख लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या हॉकर्स व रिटेलर्स यांच्या पुनर्वसनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट** : (१) प्रधानमंत्री उज्वला योजना केंद्र शासन अंगीकृत असलेल्या तेल कंपन्यांकडून राबविण्यात येते. तेल कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार सदर योजनेंतर्गत राज्यात दिनांक २८/०२/२०१८ अखेरपर्यंत १७.८६ लक्ष गॅस जोडण्या वितरीत करण्यात आलेल्या आहेत. राज्यातील गॅस जोडण्यांची संख्या विचारात घेऊन केंद्र शासनाकडून राज्यास केरोसिनचा कोटा उपलब्ध करून दिला जातो. केंद्र शासनाने माहे जुलै ते सप्टेंबर, २०१७ या तिमाहीकरीता राज्यास ९८६४० कि.ली. इतका तर माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१७ पासून ९३७०८ कि.ली इतका केरोसिन कोटा उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(२) राज्य केरोसिन मुक्त करण्याबाबत कोणतीही घोषणा करण्यात आली नाही.
(३) केरोसिन हॉकर्स व रिटेलर्स यांची नियुक्ती कमिशन तत्वावर करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ अन्वये किरकोळ/हॉकर्स विक्रेत्यांचे कमिशन रुपये २५०/-प्रति कि.ली वरून रुपये ४५०/- प्रति कि.ली. असे वाढविण्यात आले आहे.

तसेच शासन निर्णय दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ नुसार केरोसिन विक्रेते व स्वस्त धान्य दुकानातून फ्री सेल केरोसिन व ५ कि.ग्रॅ. चे लहान सिलेंडर विक्री करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या वक्फ बोर्डाच्या अखत्यारीत असलेल्या स्थावर जंगम मालमत्तेच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(५६) * ३८२६५ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वक्फ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भेंडी बाजार, मुंबई येथील पक्मोडीया स्ट्रीट, मोरेवाडी नाशिक, जालना रोड औरंगाबाद आणि पनवेल येथील अल्पसंख्याक विभागाच्या वक्फ बोर्डाच्या अखत्यारीत असलेल्या दर्गा येथील स्थावर जंगम मालमत्तेच्या गैरव्यवहार प्रकरणी सी.आय.डी.मार्फत चौकशी सुरु असून त्यामध्ये वक्फ बोर्डाचे अधिकारी श्री.मुत्तावालीस दोषी असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. १) जैनबिया ट्रस्ट, मुंबई, २) मस्जिद दुदाधारी कठडा, नाशिक, ३) मकदूम बीबी वक्फ पनवेल, जि.रायगड आणि ४) दर्गाह दाऊद औलिया मगरिबी, औरंगाबाद या ४ वक्फ मालमत्तांप्रकरणी गैरव्यवहार झाल्याविषयीच्या तक्रारी वेळोवेळी प्राप्त झालेल्या आहेत. त्यास अनुसरुन, उपरोक्त वक्फ मालमत्तांच्या प्रकरणी काही बेकायदेशीर व्यवहार (विक्री, अदलाबदल, दिर्घकालीन भाडेपट्टा, इ.) अनियमितता झाल्याचे किंवा वक्फ मालमत्ता हडप करण्यात आल्या आहेत किंवा कसे, या बाबींची चौकशी करण्यासाठी वर नमूद प्रकरणे, दिनांक ३१/७/२०१७ च्या शासन पत्रान्वये राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे चौकशी करण्यासाठी सोपविण्यात आलेली आहेत.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून अद्‌याप प्राथमिक अहवाल प्राप्त झालेला नाही. तथापि, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे या प्रकरणांची चौकशी सोपविण्यापुर्वी सदर प्रकरणाची शासनस्तरावरुन प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. या चौकशीत

१) जैनबिया ट्रस्ट, भेंडी बाजार, मुंबई या वक्फ मालमत्तेबाबत गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरण महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणामध्ये न्यायप्रविष्ट आहे. सदर प्रकरणी तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शि. व अ.) नियम, १९७९ च्या नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

२) मस्जिद दुदाधारी कठडा, नाशिक या संस्थेशी संबंधित मालमत्तेच्या गैरव्यवहाराचे प्रकरणी प्राथमिक चौकशीत तथ्य असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांना महसूल व वन विभागाच्या दिनांक ०३/०३/२०१७ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित केले होते. तथापि, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १५/०१/२०१८ च्या आदेशान्वये सदर निलंबन आदेश रद्द केले आहेत. सद्य:स्थितीत प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाकडे दावा दाखल असून तो न्यायप्रविष्ट आहे.

३) मकदूम बीबी वक्फ पनवेल, जि.रायगड या वक्फ मालमत्तेचे झालेले बेकायदेशीर हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

४) दर्गाह दाऊद औलिया मगरिबी, औरंगाबाद या वक्फ मालमत्तेच्या झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शि. व अ.) नियम, १९७९ च्या नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. तसेच या वक्फ संस्थेच्या मुतवल्लींना कायदेशीर प्रक्रिया राबवून मुतवल्ली पदावरुन दूर करण्याच्या व सदर मालमत्ता वक्फ मंडळाच्या ताब्यात घेण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ओएसिस केमिकल्स कंपनी, डोंबिवली (पश्चिम) (जि.ठाणे) कारखान्यावर कारवाई करण्याबाबत

**(५७) * ३७८१३ श्री.रविंद्र फाटक, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली एमआयडीसी टप्पा-२ मधील ओएसिस केमिकल्स W-५७ (जि.ठाणे) कंपनीतून अनेक दिवसांपासून विषारी धूर बाहेर पडून प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदूषणामुळे लहान मुले आणि जेष्ठ नागरिक यांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योग मंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ओएसिस केमिकल्स W-५७ कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) प्रश्नाधीन कंपनीमधून विषारी धूर बाहेर पडण्याची घटना दिनांक ३/१०/२०१६ रोजी घडली होती, हे खरे आहे.

(२) होय.

(३) त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या चौकशीदरम्यान प्रश्नाधीन कंपनीमध्ये दिनांक ३/१०/२०१६ रोजी रासायनिक आम्ल हाताळताना काही प्रमाणात आम्ल सांडून पावसाच्या पाण्यात मिसळल्याने त्यातून धूर निर्माण झाला होता. तसेच यादरम्यान सदर उद्योगाच्या बॉयलर मधील अतिरिक्त वाफ बाहेर सोडण्यात आल्याचे निर्दशनास आले होते. त्यानुसार संबंधित उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक ४/१०/२०१६ रोजी प्रस्तावित आदेश बजावण्यात आले होते.

सदर घटनेनंतर प्रश्नाधीन उद्योगाची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी तपासणी करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर उद्योग गेले दोन महिने बंद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहिती संप्रेक्षण व तंत्रज्ञान (आयसीटी) योजनेंतर्गत संगणक प्रयोगशाळा सुरु करण्याबाबत

**(५८) * ४०८७८ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माहिती संप्रेक्षण व तंत्रज्ञान (आयसीटी) योजना टप्पा ४ व टप्पा ५ करीता १५०० शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा सुरु करण्याबाबत केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मान्यता मिळाल्यानंतर निविदा अभावी सदरहू संगणक प्रयोगशाळा अद्यापही कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संगणक प्रयोगशाळा कार्यान्वित होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

झोन क्र. २ साठी निविदाकार अंतिम करण्यात आला असून, झोन क्र. १ व ३ ची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील जनतेला पाणीपुरवठा करण्याबाबत

**(५९) * ४०१६३ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील जनतेला अपुऱ्या आणि अनियमित पर्जन्यमानामुळे सातत्याने दुष्काळाला तोंड द्यावे लागत असल्यामुळे या भागातील तीव्र पाण्याची टंचाई लक्षात घेता शासनाने इस्त्रायलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस या शासकीय कंपनीसोबत सामंजस्य करार केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीद्वारे मराठवाड्यातील पाणी पुरवठ्यावर उपाययोजना करण्यासाठी सरासरी पर्जन्यमान धरणाची साठवण क्षमता, जलसंधारण, पुनर्वापर पुनर्चक्रीकरण, नदी खोऱ्यांमध्ये उपलब्ध असणारे पाणी, समुद्राचे पाणी गोडे करणे आदी प्रयत्न करण्यासाठी इस्त्रायल शासनाचे सहाय्य घेण्यात येणार असून या तंत्रज्ञानामुळे मराठवाडा दुष्काळमुक्त होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाड्यातील जनतेला पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.

मराठवाडयातील पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेता शासनाने इस्त्रायलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एन्टरप्रायजेस या शासकीय कंपनीसोबत दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी सामंजस्य करार केला आहे. तसेच मराठवाडयातील टंचाई परिस्थितीवर उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी सर्वकष करार करण्यात आला आहे.

(२) मराठवाडा विभागासाठी पाणी परिस्थितीचा अभ्यास करुन सर्वेक्षण व इतर कामाचा पुर्वव्यवहार्यता अहवाल प्राप्त झाल्यांनतर कामे हाती घेण्याचे नियोजित आहे. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याला प्राथमिकता देऊन उपाययोजना सुचविण्याच्या सूचना कंपनीस देण्याची तजवीज करारात ठेवण्यात आली आहे.

(३) मराठवाडा विभागासाठी ग्रीड पध्दतीच्या पाणीपुरवठा योजनेकरीता सर्वेक्षण व इतर कामाचा पुर्वव्यवहार्यता अंतिम अहवाल प्राप्त झाल्यांनतर निधीच्या उपलब्धतेनुसार आवश्यक कामे हाती घेण्याचे व पिण्याच्या पाण्याला प्राथमिकता देणेबाबत नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आसनगाव (पूर्व) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत

**(६०) * ४०७४३ अॅड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८३५ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसनगाव (पूर्व) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे लोकवस्ती वाढली असल्याने या परिसरातील संघवी पॅराडाईज गृह प्रकल्पासह अन्य गृह प्रकल्पांमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्यामुळे पावसाळ्यात देखील खाजगीरित्या स्वखर्चाने दररोज पिण्याच्या पाण्याचे टँकर्स मागवावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची असताना आसनगाव ग्रामपंचायत जाणीवपूर्वक मागील वर्षभरापासून आपली जबाबदारी टाळत असल्याचेही दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणीपुरवठा नियमित व सुरळीतरित्या सुरु करण्याच्यादृष्टीने तेथील नागरिकांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शहापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, तसेच प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांच्याकडे आजतागायत अनेकदा निवेदने सादर करुनही त्याबाबत अद्याप कार्यवाही झाली नसल्याचेही माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार तेथील नागरिकांना सुरळीत व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) आसनगाव येथे ग्रामपंचायतीच्या मालकीच्या तीन स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना आहेत. आसनगाव पूर्व विभाग व संघवी पॅराडाईज गृह प्रकल्प या ठिकाणी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत किंवा स्वखर्चाने टँकरने पाणी घेत असल्याबाबतची तक्रार ग्रामपंचायतीकडे प्राप्त झालेली नाही.

माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये सुरुवातीच्या काळात भातसा डॅमच्या पाण्याचा विसर्ग बंद झाल्यामुळे आसनगाव-सावरोली योजनेतून पाणीपुरवठा खंडीत झाला होता. याबाबत भातसा विभाग क्र. १ यांच्याकडे संपर्क साधून पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला होता. दरम्यान तेथे झालेल्या अतिवृष्टीमुळे विद्युत ट्रान्सफार्मर नादुरुस्त झाल्यामुळे पाणीपुरवठा खंडीत झाला होता. नवीन ट्रान्सफार्मर बसवून पाणीपुरवठा सुरु करण्यात आला होता. तद्नंतर विद्युत मोटार पंप नादुरुस्त झाल्याने विद्युत मोटार पंप दुरुस्त करुन पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## "खेलो इंडिया" योजनेंतर्गत राज्यातील खेळाडूंना सराव करण्यासाठी साहित्य पुरविण्याबाबत

**(६१) * ४०४४० श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील खेळाला चालना देण्यासाठी क्रीडा मंत्रालयामार्फत "खेलो इंडिया" योजनेंतर्गत राज्यातील खेळाडूंना किट्ही मिळाले नसून मागील सात महिन्यांपासून सराव करणारे राज्यातील ४०० खेळाडू अदयाप या माफक सुविधेच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विभागीय कार्यालय असलेल्या मुंबई शहरातून सदर कामासाठी पाठपुरावा केला जात असल्याचे सांगण्यात येत असले तरी ठेकेदार दाद देत

नसून माफक गरजाही भारतीय खेळ प्राधिकरण (साई) तर्फे पुरविल्या जात नसल्याने इथे कशासाठी शिकावे असा प्रश्न राज्यातील खेळाडूंपुढे निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खेळाडूंना सराव करण्यासाठी साहित्य पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

सदर बाब केंद्र शासनाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाशी (साई) संबंधित आहे.

(२) व (३) भारतीय खेळ प्राधिकरणाचे विभागीय कार्यालय, कांदिवली, मुंबई येथे असून कांदिवली व औरंगाबाद येथे विविध खेळ प्रकारामधील खेळाडू सराव करत आहेत. त्यांचेकरीता संबंधित विभागाने विविध खेळ प्रकारांचे किट्स पुरविणेकरीता ई-निविदा प्रक्रियाद्वारे पुरवठादार निश्चित करुन खेळांचे किट पुरविणेसाठी वर्क ऑर्डर देण्यात आली होती. तथापि, पुरवठादार यांनी माहे जुलै, २०१७ मध्ये खेळाचे किट्स पुरविण्याऐवजी माहे जानेवारी, २०१८ मध्ये पुरविले असून क्रीडा साहित्य पुरविण्यास झालेल्या विलंबाकरीता पुरवठादास सक्त ताकीद साई कार्यालय, कांदिवली, मुंबई व औरंगाबाद कडून देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील गावपाडयांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(६२) * ४०४८८ श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३२४९० ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील नळ पाणीपुरवठा योजनांना मंजूरी मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक

८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले असून रायगडातील गावपाडयांत आतापासूनच पाणीटंचाई निर्माण झाली असून यावर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने १८१० गावासाठी ८ कोटी ६३ लाखांचा पाणीटंचाई आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आराखडयात किती गावे व वाडयांचा समावेश करण्यात आला आहे, त्याचे स्वरुप काय आहे व उक्त आराखडयावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नळ पाणीपुरवठा योजनांना मंजूरी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.
(२) रायगड जिल्ह्याचा सन २०१७-१८ (ऑक्टोबर, २०१७ ते जून, २०१८) चा संभाव्य पिण्याचे पाणी टंचाई कृती आराखडा मंजूर करण्यात आला असून तो खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संभाव्य उपाययोजना | गावे | वाडया | किंमत (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | टँकरने पाणीपुरवठा | ३५४ | ८७७ | ५३२.२८ |
| २ | विंधन विहिरी खोदणे | १५४ | ४२५ | ३३०.७३ |
| | एकूण | ५०८ | १३०२ | ८६३.०१ |

रायगड जिल्ह्यामध्ये उक्त पाणी टंचाई कृती आराखडयानुसार संबंधित ग्राम पंचायतीच्या मागणीनुसार टंचाई अंतर्गत उपाययोजना घेण्यात येत आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून ९७ नविन विंधन विहिरी खोदण्यास मान्यता देण्यात आली असून विंधन विहिरी खोदाईचा कार्यक्रम २७ फेब्रुवारी, २०१८ पासून सुरु करण्यात आला आहे. तसेच आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(३) लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री महोदयांना दिनांक ०८/०८/२०१७ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद गावांच्या योजनांच्या प्रस्तावाबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे:- चिंभावे, सुतारकोंड, दळवीवाडी, वसाप कालपकोंड, खैरे, बेबलघर या गावांचा समावेश खैरे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१७-१८ च्या कृति आराखडयात करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच शिरसवणे धनगरवाडी येथील साठवण तलाव जिल्हा परिषद सेस निधीमधून घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(६३) * ४०५०४ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील महिलांना पाणीटंचाईच्या काळात सहज पाणी मिळावे याकरिता १८० पाणीपुरवठा योजना, जलशिवारातील पाणी अडवून जलसाठे निर्माण करण्याकरिता व बोअरवेल खोदण्याकरिता करोडो रुपये शासनाने खर्च करुनही तालुक्यातील महिलांना पाण्यासाठी भटकावे लागत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पावसाचे पाणी वस्त्यांमध्ये साठविण्याची (Water Harvesting Scheme) योजनाही राबविली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पाणी पुरवठ्यासाठी टँकर देण्याबाबत तसेच पावसाळ्यात पाणी साठवून ठेवण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) मागील १० वर्षामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) अंतर्गत भूजल पुनर्भरणाच्या एकूण १५ उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

(३) पिण्याच्या पाण्याची टंचाई भासल्यास आवश्यकतेनुसार टंचाई अंतर्गत उपाययोजना राबविण्यात येतात. तसेच पाऊस पाणी संकलन करण्याच्यादृष्टीने ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या पाणी टंचाईग्रस्त गावे/वाडयांमध्ये अशा प्रकारच्या टाक्या बसविण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षक भरतीसाठी अनिवार्य करण्यात आलेली अभियोग्यता आणि बुध्दिमत्ता चाचणी रद्द करण्याबाबत

**(६४) * ४०६६९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक भरतीसाठी टीईटी अनिवार्य असतानाच आता अभियोग्यता आणि बुध्दिमत्ता चाचणी अनिवार्य करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साडेसोळा लाख उमेदवारांनी टीईटी परिक्षा दिली असून या परिक्षेतून शासनास कोट्यवधी रुपयांचे शुल्क प्राप्त झाले असूनही अद्यापपर्यंत एकाही उमेदवाराला नोकरी दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उमेदवारांची आर्थिक फसवणूक केली असल्याचे तसेच अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचण्या अनिवार्य केल्याने शासनाचा आर्थिक फायदा झाला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २००८ नंतर शिक्षक भरतीची प्रक्रिया बंद असल्यामुळे ९ लाख डी.एड. तर ६ लाख बी.एड. पदवीधारक शिक्षक बेरोजगार असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून शिक्षक बेरोजगारांची अशी अवस्था पाहून विद्यार्थ्यांअभावी अध्यापक महाविद्यालये बंद होत असून या नविन प्रक्रियेमुळे पात्रता परीक्षार्थींना शिक्षकांची नियुक्ती मिळणार आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेरोजगार डी.एड व बी.एड. पदवीधारक शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) "शिक्षक पात्रता परीक्षा" ही प्राथमिक शिक्षकांसाठी आवश्यक असलेली अर्हता परीक्षा असून अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी परीक्षेतील गुणांच्या आधारे शिक्षण सेवक भरतीबाबतचा निर्णय दिनांक २३/०६/२०१७ रोजी घेतलेला आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सन २०१० मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील प्राथमिक शिक्षकाच्या नियुक्तीकरिता केंद्रिय भरतीपूर्व निवड परीक्षा घेण्यात आलेली असून १५००० पेक्षा अधिक पात्र उमेदवारांची शिक्षणसेवक पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. आता राज्यातील खाजगीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व माध्यमाच्या शाळांमधील शिक्षण सेवक भरती, अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे करण्याकरिता माहे डिसेंबर, २०१७ मध्ये सदर परीक्षा घेण्यात आलेली आहे. "पवित्र" या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून सदर भरती प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील हातपंपाची दुरुस्ती व देखभाल करण्याबाबत

**(६५) * ४०६८० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात हातपंपाची संख्या सध्या ८ हजार ७०३ असून या हातपंपांची दुरुस्ती व देखभाल केवळ २२ कर्मचाऱ्यांवरच अवलंबून असणे, अनेक ठिकाणी हातपंप नादुरुस्त असून त्यांची दुरुस्ती वेळेवर होत नसणे, त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी इतरत्र जावे लागत असल्याने त्यांच्यात असंतोष पसरला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हातपंपाची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

नांदेड जिल्ह्यात १६ तालुके अंतर्गत ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत म्हणून एकूण ८७०३ हातपंप आहेत. सन २०१८ मधील जानेवारी महिन्यातील नादुरुस्त हातपंपाची संख्या ४४६ होती. त्यापैकी ३७२ हातपंप दुरुस्त करण्यात आले आहेत. त्याकरीता जिल्ह्यातील पंचायत समितीस्तरावर हातपंप दुरुस्तीचे फिरते पथक असून त्यावर ३१ कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीसाठी टंचाई कालावधीकरीता २ अतिरिक्त मनुष्यबळ याप्रमाणे १६ पंचायत समितीसाठी ३२ अतिरिक्त कामगार लावण्याबाबत संबंधित गटविकास अधिकारी यांना दिनांक १०/०१/२०१८ पासून परवानगी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या अंशदायी निवृत्तीवेतनाची रक्कम अदा करण्याबाबत

**(६६) * ३७८९५ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जानेवारी, २००६ पासून राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांना ६ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी सन २००९ पासून करण्यात आली असून दिनांक १ जानेवारी, २००६ पासूनच्या फरकाची रक्कम राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन परिभाषित अंशदायी योजनेनुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षकांची खाती बरेच दिवस न काढल्याने या शिक्षकांच्या खात्यात ६ व्या वेतन आयोगाच्या फरकाच्या हप्त्याची रक्कम जमा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त नवीन अंशदान परिभाषित पेन्शन योजनेनुसार शासनाने आपल्या हिश्श्याची रक्कम जमा करावयाची तरतूद माहे मार्च, २०१७ च्या अधिवेशनात केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त शिक्षकांची नवीन परिभाषित अंशदान पेन्शन योजनेच्या खात्यात ६ व्या वेतन आयोगाच्या हप्त्याची रक्कम व्याजासह जमा करणे तसेच नवीन अंशदान परिभाषित पेन्शन योजनेनुसार शासनाने आपल्या हिश्श्याची तरतूद केलेली रक्कम या शिक्षकांच्या खात्यात वर्ग करण्याबाबत शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधीकडून मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांच्या खात्यात ६ व्या वेतन आयोगाच्या हप्त्याची रक्कम व्याजासह जमा करुन शिक्षकांच्या खात्यात वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) अंशत: खरे आहे.
(५) ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी जमा करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नगर परिषद शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्ती मिळणेबाबत

**(६७) * ३८८२४ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक २९५६१ ला दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नगर परिषदेतील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्च देण्याबाबत अमरावती विभाग शिक्षक आघाडीच्यावतीने प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्याकडे निवेदनाद्वारे दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील नगर परिषदेमधील कार्यरत शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपरिषदांच्या अखत्यारीतील प्राथमिक शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयाच्या अधिन राहून प्रतिपूर्ती मंजूर करण्यात येते. दिनांक १५/७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये रुपये २ लक्ष पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार संबंधित प्रशासन अधिकारी तसेच रुपये २ लक्ष पेक्षा जास्त व रुपये ३ लक्ष पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार संबधित विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आले आहेत.

-----------------

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राहय धरुन त्यांना इतर लाभ देण्याबाबत

**(६८) * ३८१७४ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५१३१ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात सन १९९१ ते मार्च, २००० या कालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राहय धरुन त्यांना इतर सर्व अनुषंगिक लाभ देणेबाबत मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार सोलापूर, अमरावती इत्यादी काही उच्च शिक्षण सहसंचालकांनी संबंधित याचिकाकर्त्यांना सेवाविषयी बाबींचे सर्व लाभ देण्याबाबत कार्यवाही केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद, जळगांव, नांदेड इत्यादी शिक्षण सहसंचालकांनी निकाल लागलेल्या याचिकाकर्त्या अधिव्याख्यात्यांना वेतन निश्चितीचे लाभ देणे व त्यांची सेवाग्राहय धरण्याबाबतची कार्यवाही पूर्ण केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्याबाबत शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केलेली असून सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक/शिक्षकेतरांच्या अनुकंपा तत्वावरील भरती करण्याबाबत

**(६९) * ३८९५६ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हजारो शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनुकंपा तत्वावरील प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे त्यांच्या कुटुंबांची दुर्दशा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कृती आराखडा तयार केला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच अनुकंपा तत्वावर शिक्षण सेवक पदावरील नियुक्तीबाबत शासन निर्णय दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी पारित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाळा प्रवेश केंद्रिय प्रवेश पध्दतीने करण्याबाबत

**(७०) * ३८३६३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांचा मोफत व सक्तीचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार विद्यार्थ्यांसाठी १ ते ३ कि.मी. परिसरात राहण्याची अट बंधनकारक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमुळे प्रवेशासाठी अनैसर्गिक स्पर्धा निर्माण झाली असून खाजगी मराठी प्राथमिक/माध्यमिक शाळांना आवश्यक विद्यार्थी संख्या प्राप्त नसल्याने मराठी शाळेतील शिक्षकांना वेगवेगळया मार्गाने विद्यार्थी जमवावे लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विषयी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी इयत्ता १ ली, ५ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांचे प्रवेश केंद्रिय पध्दतीने करण्याची मागणी शासनास दिनांक ५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन देवून केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

सन्माननीय लोकप्रतिनिधींचे दिनांक ०८/०५/२०१७ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) आर.टी.ई. अंतर्गत वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के प्रवेश राखीव ठेवण्याची तरतूद आहे. सदर प्रवेश केंद्रिय पध्दतीने प्रवेशस्तरावर (इयत्ता १ ली किंवा पूर्व प्राथमिक) ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रलंबित विकास प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(७१) * ३९५३१ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३५६३८ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १९४ विकास प्रकल्प पर्यावरणाच्या मंजुरीविना प्रलंबित असल्याप्रकरणी व सदर बाब केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल

मंत्रालयाच्या अखत्यारीत असल्याने सदर प्रश्नाविषयीच्या वस्तुस्थितीसंबंधीची मागविण्यात आलेली माहिती राज्य शासनास प्राप्त झाली आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित विकास प्रकल्प पूर्ण करण्याच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला व त्यासाठी कोणता पाठपुरावा करण्यात आला, तसेच केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाकडून प्रलंबित विकास प्रकल्पासंबंधीची प्रस्तुत माहिती केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन प्रलंबित विकास प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) नाही.

(२) व (३) सदर बाब केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या अखत्यारीत असून याबाबत यापूर्वीच्या विधानपरिषद तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.

पर्यावरण आघात अधिसूचना, २००६ मधील तरतुदीनुसार अ-संवर्गात मोडणाऱ्या (Category-A) प्रकल्पांचे प्रकल्प प्रवर्तकांमार्फत थेट केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाकडे पर्यावरणविषयक अनुमतीसाठी अर्ज दाखल करण्यात येतो व त्यावर परस्पर केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाच्या उच्च शिक्षण विभागातील सहसंचालक पदाची सेवाप्रवेश नियमावली तयार करण्याबाबत

**(७२) * ४०३३१ आर्कि.अनंत गाडगीळ** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या उच्च शिक्षण विभागातील संचालकांसह सर्व प्रथम वर्ग अधिकाऱ्यांची पदे राज्य लोकसेवा आयोगामार्फत भरली जात असताना केवळ

सहसंचालक हे पद कोणतीही सेवाप्रवेश नियमावली न घेता भरले जात असल्याचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदासाठी २३ वर्षापासून सेवाप्रवेशाची नियमावलीच तयार केली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यासंदर्भातील निर्णय घेवून सदरील पदासाठी सेवाप्रवेश नियमावली तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) होय.

(३) सहसंचालक पदाचे सेवाप्रवेश नियम मान्यतेची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळोजा, चाळ येथे जैविक कचऱ्याच्या विघटन प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(७३) * ३९१६३ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा, चाळ येथे असलेल्या डंपिंग ग्राऊंड व राम के. ग्रुप कंपनीमध्ये रासायनिक प्रक्रिया करून घातक जैविक कचऱ्याचे विघटन करण्याचे कार्य केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रक्रियेमुळे कुजवुन ठेवलेल्या कचऱ्यावर आवरण न टाकल्याने पावसाळयात पाणी पडून हे पाणी आजूबाजूला असलेल्या गावात जवळपास ५० एकर शेतीमध्ये मुरले जाते, यामुळे सदरील जमिनीवर असलेली शेती नष्ट होवून जमीन नापीक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांना शासनामार्फत नुकसान भरपाई दिली जाते काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सिडकोच्या चाळ येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामधून सन २०१७ च्या पावसाळयात आजूबाजूच्या गावात काही प्रमाणात पाणी जात असल्याबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली होती.

(३) व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सिडको प्रशासनावर दिनांक २२/०८/२०१७ रोजी न्यायालयात खटला का दाखल करण्यात येऊ नये असे निर्देश पारित केलेले आहेत तद्‍नंतर सिडको प्रशासनाने योग्य त्या शास्त्रोक्तपध्दतीने सुधारीत काम चालू केले आहे. त्यामुळे प्रकल्पामधून आजूबाजूच्या परिसरात पाणी जात नसल्याचे दिसून येते.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पी.एच.डी.धारक विद्‍यार्थी सहाय्यक प्राध्यापक पदावर काम करीत असल्याबाबत

**(७४) * ४०८३६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये प्राध्यापक पदाच्या हजारो जागा शिल्लक असताना शासनाने जाहिरात न काढल्यामुळे अनेक पी.एच.डी.धारकांना महिना ६ हजार ७२० रुपयामध्ये काम करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या खाजगीकरणाच्या धोरणामुळे निवृत्त झालेल्या प्राध्यापकांच्या जागेवर नव्याने भरती न करण्यात आल्याने रिक्त पदावर पी.एच.डी, नेट-सेट झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांची तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भरतीवरील बंदी उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) व (४) वित्त विभागाच्या प्रचलित धोरणानुसार पदांच्या आढाव्यास /आकृतिबंधास अंतिम मंजूरी मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. महत्वाची रिक्त पदे भरण्यासंदर्भात वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. महत्वाची रिक्त पदे भरण्यासंदर्भात वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

-----------------

## नांदेड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७५) * ४०६८३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभाग सध्या प्रभारीवर असून पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे शिक्षण विभागातील सर्वच कामे प्रलंबित असून मागील तीन वर्षापासून शिक्षकांच्या सेवा ज्येष्ठता याद्या अद्यावत नसल्याने या विभागातील पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागात रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) शिक्षणाधिकारी गट-अ, उपशिक्षणाधिकारी गट-ब, अधिक्षक, महाराष्ट्र शिक्षक सेवा गट-ब व अधिक्षक सामान्य राज्य सेवा गट-ब मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.